अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**सभा क्रमांक - ०७ बुधवार दिनांक २८/०३/२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहात होणा-या मा.सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ४२ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१७-२०१८ चे सुधारित व सन २०१८ - २०१९ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह) मा.स्थायी समिती ठराव क्र. ७६ दिनांक १९/०३/२०१८ अन्वये शिफारशीसह मंजुरीसाठी. |
| ४३ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : २२/०३/२०१८.
अहमदनगर.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०७ / २०१८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : २२-०३-२०१८.

**अहमदनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेची सुचना.**

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०७, बुधवार दिनांक २८-०३-२०१८.**

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती........................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस-

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ (अ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक २८-०३-२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहात** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०७ / २०१८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक :     -०३-२०१८.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.......................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस-

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा ---वार दिनांक     -०३-२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केली होती. या सभेत अंदाजपत्रक सादर केल्यानंतर त्यावर अभ्यासासाठी सदस्यांना अवधी मिळावा या मागणीनुसार सदरची सभा मा.महापौर यांनी तहकुब करुन, **तहकुब सभा --- वार दिनांक   /०३/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** पुढे सुरु होईल असे आदेशीत केले आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**सभा क्रमांक ०७**

**प्रस्ताव क्रमांक : ४२** **दिनांक २८ /०३/२०१८**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१७-२०१८ चे सुधारित व सन २०१८ - २०१९ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह) मा.स्थायी समिती ठराव क्र. ७६ दिनांक १९/०३/२०१८ अन्वये शिफारशीसह मंजुरीसाठी.

--*--

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंती टिप्पणी देण्यात येते की, सन २०१७-२०१८ चे सुधारीत व सन २०१८-२०१९ चे मुळ अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७६ दिनांक १९/०३/२०१८ अन्वये शिफारस करण्यात आली असून अखेर मंजुरीस्तव मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यास सूचीत केले आहे.

तरी सन २०१७-२०१८ चे सुधारीत व सन २०१८-२०१९ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह ) चा विषय मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यात यावा. ही विनंती.

**---*---**

**दिनांक १९/०३/२०१८ रोजी झालेल्या मा.स्थायी समितीच्या विषय क्रमांक ७६ चा ठराव :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१७-२०१८ चे सुधारित व सन २०१८-२०१९ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार मा.स्थायी समिती सभेस अंदाजपत्रक विचारार्थ सादर करण्यात आले. मा.स्थायी समिती सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१७-२०१८ चे सुधारित व सन २०१८-२०१९ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१७-२०१८ चे सुधारित व सन २०१८-२०१९ चे सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे **सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये** दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

**तसेच**

* सर्वसाधारण कर वसुलीमध्ये वस्तुनिष्ठपणाच्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत वाढणार असल्याने सर्वसाधारण करामध्ये रूपये १ कोटी ने वाढ सुचविणेस ही सभा मान्यता देत आहे.

* बिगरशेती करतांना महानगरपालिका हद्दी मध्ये बिगरशेती जामीनीवर टॅक्स लावणे अपेक्षित आहे.मालमत्ता सध्या शेती असून बिगरशेतीचे प्रस्ताव सादर करतांना त्यांचेकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही असे निदर्शनास येत आहे.या करीता नविन लेखाशिर्ष तयार करून या लेखाशिर्ष मध्ये रू.५० लाख तरतुद करण्यात यावी.

* स्थानिक संस्था करामध्ये कर या लेखाशिर्षा अंतर्गत रू.२५ लाखांची तरतुद दर्शविण्यात यावी.

* नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून मुंबई नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत फि पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.या लेखाशिर्षा मध्ये ८ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

* चालू रेडीरेकनरच्या दरानुसार भाडे आकारणी केली असल्याने गाळे धारक भाडे उत्पन्नच्या दृष्टीने गाळे धारक व प्रशासन यांनी समन्वय साधून कार्यवाही केल्यास उत्पन्नात भर पडणार असल्याने गाळा भाडे लेखाशिर्षा मध्ये रू.२० लाखाची वाढ करण्यात यावी.

* गाळे हस्तांतरणाची प्रक्रिया त्वरीत राबवून गाळे हस्तांतरण फी या लेखाशिर्षामध्ये रू.१० लाखाची वाढ सुचविण्यात येत आहे.

*नोटीस फि/ शास्ती या लेखाशिर्षा अंतर्गत रू.४ कोटी ३९लाख ६० हजार नी वाढ करण्यात यावी.

* कलम ४१ खाली प्रस्ताव दाखल केल्यानंतर महासभेने दंडात्मक आकरणी करून जास्तीत जास्त उत्पन्न वाढीच्या दृष्टीने प्रयत्न करून अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाखांनी वाढ करण्यात यावी.

* प्रॉपर्टींची नव्याने वाढ होवून घरपट्टी उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होईल. मालमत्ता नांव नोंदणी फि या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे

* जाहिरात बोर्ड जागा भाडे या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रूपये १०लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* तात्कालीन नगरपालिका असतांना शाळांकरीता भाडेतत्वावर वर्गखोल्या भाडयाने दिलेले आहे.त्यावेळचे भाडे व सदयस्थिती तील भाडे याचा विचार करता या लेखाशिर्षामध्ये १० लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

*मा.महासभेमध्ये झालेल्या ठरावा नुसार शहरात विविध ठिकाणी पे ॲण्ड पार्क करीता जागा निश्चिती झाली असून या लेखाशिर्षामध्ये मोठया प्रमाणात उत्पन्न मिळणार असल्याने या लेखाशिर्षा मध्ये १० लाख रूपयांची तरतुद दर्शविण्यात यावी.

*मोबाईल टॉवर प्रशासकिय शुल्क या लेखाशिर्षामध्ये रू.१० लाख रूपयांची वाढ सुचविण्यात येत आहे.

*मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखाची वाढ करण्यात यावी.

*जाहिरातीच्या माध्यमातून रॉयल्टी पोटी उत्पन्न मिळेल गॅन्ट्रीज रॉयल्टी या लेखाशिर्षा मध्ये रू.२० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

*डॉक्टरांकडून जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी कामा करीता आकारण्यात येणा-या दरामध्ये वाढ होणार असल्याने जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट या लेखाशिर्षा मध्ये ८ लाखांनी वाढ करण्यात यावी.तसेच निविदेची मुदत जुलै २०१८ मध्ये संपत असल्याने निविदा प्रक्रीया व प्रशासकीय सोपस्कार करणे करीता बराच कालावधी लागतो.त्यामुळे तात्काळ निविदा प्रसिध्द करण्यात यावी.

*खाजगी तत्वावर कचरा संकलन वाहतुक निविदा झाली असल्याने घनकचरा संकलन व वाहतुक अंतर्गत मनपा वाहन भाडेपासून उत्पन्नामध्ये रू.२० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

*मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाखांनी वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

*अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम वाढवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. अनाधिकृत नळ निमानुकुल करणे या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटीची वाढ करण्यात यावी.

*नळ धारकांकडून जमा पाणीपट्टी या लेखाशिर्षाअंतर्गत रू. २ कोटीची वाढ करण्यात यावी.

*पाणी विक्री जमा या लेखाशिर्षा मध्ये रू.१ कोटी ७५ लाख दर्शविण्यात यावी.

*निवडूक खर्च या लेखाशिर्षा अंतर्गत रू.१० लाखांनी कपात करण्यात यावी.

*नविन संगणक,संगणक साहित्य,हार्डवेअर,सॅाप्टवेअर,खरेदी (सर्व विभाग)/ ई.गर्व्हनर्स रू.२५ लाख ऐवजी रक्कम रूपये २० लाख दर्शविण्यात यावी.

* सावेडी गांवठाण सिटी सर्व्हे साठी तरतुद रू.१० लाखांची वाढ सुचविण्यात येत आहे.

*मालमत्ता कर वसुली विभाग मधील अ.क्र.४ आकस्मिक खर्च या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये ३लाखाने वाढ करून रक्कम रूपये ५ लाख २५ हजार दर्शविण्यात यावी.

*मा. शासनाकडून या करीता निधीची मागणी येवून अग्निशमन विभाग नविन वाहन खरेदी लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २० लाखांनी कमी करण्यात यावी.

*अग्निशमन सल्लागार अनुदान या लेखाशिर्षा मध्ये रू.६ लाखांनी कमी करण्यात यावी.

*मोकाट कुत्रे बंदोबस्त करणे व दंशावर उपचार करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रू. ३० लाख ठेवण्यात यावी.

*मोकाट जनावरे बंदोबस्त या लेखाशिर्षा अंतर्गत रू.७ लाख ठेवण्यात यावी.

* विदयुत साहित्य खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत रू.२० लाख तरतुद कमी करण्यात यावी.

*जुने पोल हलविणे या लेखाशिर्षा अंतर्गत रू. ३ लाख तरतुद ठेवण्यात यावी.तसेच नवीन इले. पोल, स्ट्रीट लाईट पॅन फिटींग या लेखाशिर्षा अंतर्गत रू.१ लाख तरतुद ठेवण्यात येत आहे.

* सोलार पथदिवे दुरूस्ती रू. १ लाखाची तरतुद ठेवण्यात यावी.

* सार्वजनिक आरोग्य व सोयी सुविधा मधील वर्कशॉप मधील अ.क्र.नं ८ मधील नविन वाहन खरेदी या लेखाशिर्षा मध्ये रू.१० लाखा ऐवजी रू.५लाख दाखविण्यात यावी.

* नविन वाहन खरेदी (रक्तपेढी ) तरतुद रू.५ लाख ठेवण्यात यावी.

* नविन शव वाहिनी खरेदी/ ॲम्बुलन्स खरेदी या लेखाशिर्षा मधील १५ लाखाने कमी करून ५ लक्ष दर्शविण्यात यावी.

* स्त्री जन्माचे स्वागत या लेखाशिर्षाका अंतर्गत रू.१ लाख तरतुद ठेवा.

* खाजगी सुरक्षा रक्षक नेमणे (कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना) रू.५ लाख दर्शविण्यात यावी.

* हिवताप प्रतिबंधक योजना कंत्राटी पध्दतीने फवारणी करणे रू.२० लाख व पिंजरे खरेदी करीता रू.१० हजारांची तरतुद ठेवावी.

* कोंडवाडा बांधकाम रूपये ५लाख ऐवजी रू.१ लाखाची तरतुद ठेवण्यात यावी.

* वैरण व चारा खरेदी करणे रू.२.५लाख ऐवजी १ लाख दर्शविण्या यावी.

* गुच्छ व हार खरेदी रू.२ लाख तरतुद वाढविण्यात यावी.

* वृक्षारोपण,वृक्षसंरक्षण, ट्री गार्ड खरेदी रू.७० लाख ऐवजी १० लाख तरतुद ठेवण्यात यावी.

* बागेतील खेळणी खरेदी रू.४ लाख,ऐवजी ३ लाख ठेवण्यात यावी.

* वृक्ष गणना नंबर टाकणे रू.१ लाख ठेवण्यात यावी.

* झाडांना टॅकर व्दारे पाणी देणे रू.५०हजार ठेवण्यात यावी.

* मशिनरी व वाहन भाडे ६५लाखाऐवजी २५लाख तरतुद ठेवण्यात यावी.

* शहरातील ओढे नाले,नदीपात्रातील अतिक्रण हटविणे रू.२२ लाख ऐवजी १५ लाख ठेवण्यात यावे.

* सिना नदी पात्रातील हद्द निश्चित करणे रू.९० लाख ऐवजी २५ लाख तरतुद ठेवण्यात यावी

* नविन लेखाशिर्षा तयार करून गणित व विज्ञान प्रदर्शना करीता रू.५० हजारांची तरतुद ठेवण्यात यावी.

* शाळामध्ये ई -लर्निग सुविधा या लेखाशिर्षा अंतर्गत रू.१०लाख दर्शविण्यात यावी.

* वार्ड विकास निधी या लेखाशिर्षाअंतर्गत रू. २ कोटी ५५ लाखाची तरतुद करण्यात यावी त्यामुळे प्रभागात कमीत कमी रू.१३ लाखाची कामे करता येतील.

* अधिकारी यांचे निवास बांधणे व सोई सुविधा या लेखाशिर्षा रू.१ लाख ठेवण्यात यावेत.

* स्मशान भुमी सुधारणा व नविन स्मशान भुमी या लेखाशिर्षा मध्ये २५ लाख रूपयांनी कपात करण्यात यावी.

* मा.महापौर शहर विकास निधी रू.३ कोटी, मा.उपमहापौर शहर विकास निधी रू.७५लाख, मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रू.७५ लाख, सभापती महिला व बाल विकास निधी रू.२० लाख, उपसभापती महिला व बाल कल्याणस निधी रू.१५ लाख, मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी रू.२५ लाख अनुक्रमे या प्रमाणे लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद करण्यात यावी.

* मा.सभागृह नेते शहर विकास निधी हे नविन लेखाशिर्षा निर्माण करण्यात येवून त्यामध्ये रू.२५ लाखाची तरतुद करण्यात यावी.

* मा.महापौर शहर विकास निधी, मा.उपमहापौर शहर विकास निधी, मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी , सभापती महिला व बाल विकास निधी , उपसभापती महिला व बाल कल्याणस निधी , मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी ,मा.सभागृह नेते शहर विकास निधी या लेखाशिर्षा अंतर्गत झालेल्या कामाचे देयके अर्थविभागाकडे प्राप्त झाल्या नंतर ती प्राधान्याने अदा करण्यात यावी.

* कल्याण रोड येथील रस्ते विकास या लेखाशिर्षा अंतर्गत अ) ओहोळ काटा ते विदया टॉवर रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे (रू.२० लाख) ब) जगताप सर घर ते शेरकर मेजर घरापर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे (रू.२० लाख) क) नागवडे घर ते डॉ.घुमरे घर ते डेरे घरापर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे (रू.२० लाख) ड) दिपाली हॉटेल ते दिव्या टॅवर पर्यत रस्त्याच्या डांबरीकरणासह मजबुती करणत करणे (रू.५० लाख) ड)असे एकुण रू.१ ोटी १० लाख तरतुद करण्यात यावी.

* मॉडेल रस्ता विकसीत करणे या लेखाशिर्षाअंतर्गत काटवण खंडोबा चौक ते खोकर नाल्यापर्यत चा रस्ता रूंदीकरण,मजबुतीकरण,डांबरीकरण व सुशोभीकरण करणे १ कोटी ५० लाख तरतुद करण्यात यावी.

* मोबाईल टॉवर उत्पन्नातुन विकास कामे करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५०लाखांची वाढ करण्यात यावी.

* अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५०लाखांची वाढ करण्यात यावी.

* उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव या लेखाशिर्षा अंतर्गत ३ डिसेंबर " जागतिक दिव्यांग दिन " निमित्त अहमदनगर महानगरपालिकेच्या दिव्यांग मनपा कर्मचा-यांकरीता "गौरव पुरस्कर" सुरू करण्यात येवून या करीता रू.१ लाखाची तरतुद नविन लेखाशिर्षा तयार करून करण्यात यावी.

* भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतीबा फुले,यांचा पुतळा महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये बसविणे करीता अर्थसंकल्पामध्ये तरतुद करण्यात आलेली आहे.परंतु प्रत्यक्षात अनेक वर्षा पासुन या वर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली दिसुन येत नाही.या करीता जागा निश्चिती पासून काम पुर्ण होईपर्यतचे संपुर्ण कामा करीता कालमर्यादेत पुर्ण करण्यात यावे.

* छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती संभाजी महाराज,पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांचा पुतळया करीता अनुक्रमे रूपये २० लाखांची तरतुद करण्यात यावी.

* छत्रपती शाहु महाराज पुतळया करीता नविन लेखाशिर्ष निर्माण करून या मध्ये रूपये २० लाखांची तरतुद करण्यात यावी.

* सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षा अंतर्गत रसिक ग्रुप, गुडी पाडवा उत्सवा करीता रू.१.५० लाख,नगर जल्लोष ट्रस्ट नगर शहर स्थापना दिन साजरा करणे करीता रू.१.५० लाख, रायगड तरूण मंडळ ट्रस्ट उत्सवा करीता रू.१.५०लाख,नंदनवन मित्र मंडळ ट्रस्ट उत्सवा करीता रू.१.५० व वेगवेगळया महिला सांस्कृतीक,सामाजीक संस्था प्रतिवर्षी विविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजीत करतात. त्यांना अनुदान दिले जाते. सामाजिक संस्थांना देणगी लेखाशिर्षा मध्ये रू.२ लाखांनी वाढ करण्यात यावी.

* भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे अदयावत जीम बांधकाम करणे व व्यायाम साहित्य खरेदी करणे करीता रू.५० लाख रूपयांची तरतुद नविन लेखाशिर्ष तयार करून करण्यात यावी.

* आगरकर मळा भागातील खोकर नाला या पुलाची उंची वाढविणे करीता नविन लेखाशिर्षा निर्माण करून त्यामध्ये रूपये ५० लाखांची तरतुद करण्यात यावी.

* कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना च्या धर्तीवर सावेडी उपनगरामध्ये अदयावत हॉस्पीटल बांधण्या करीता रूपये १ कोटी तरतुद नविन लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.

* सावेडी भागातील सोनानगर,रासने नगर,भाग्योदय कॉलनी अंतर्गत रस्ता मजबुती करण,डांबरीकरण व पेव्हिंग ब्लॉक बसविणे या कामा करीता रूपये १ कोटी तरतुद नविन लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.

* सावेडी भागामध्ये अदयावत भाजी मार्केट बांधणे करीता रक्कम रूपये १ कोटी तरतुद नविन लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.

* प्र.क्र.३ मध्ये संत नामदेव चौक ते भारव्दाज घर ते शर्मा घर ते गुंजाळ घर पर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह मजबुती करणासह डांबरीकरण करणे व टयुबलर पोलवर एल.ई.डी फिटींग बसविणे करीता रूपये ३०लाख तरतुद नविन लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.

* जलतरण तलाव बांधणे अनुदान पान नं.५२ वरील अ.क्र.नं.४८ या नविन लेखाशिर्षा अंतर्गत रूपये १ कोटी ५०लाखांची तरतुद करण्यात आलेली आहे.या लेखाशिर्षा मधून सावेडी उपनगरामध्ये महिला व पुरूष यांचे करीता जलतरण तलावाचे काम करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१७-२०१८ चे सुधारित अंदाजपत्रकातील तरतुदींची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सन २०१८-२०१९अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०१७-२०१८ चे सुधारित व सन २०१८-२०१९ सालचे बाबवार अंदाजपत्रक मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.उषा शिवाजीराव नलवडे

अनुमोदक :- मा.सौ.अनिता राजेंद्र राठोड

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

( सौ. सुवर्णा दत्ता जाधव)

सभापती, स्थायी समिती,

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर**

**मा. स्थायी समितीने मंजूर केलेला सन २०१८-२०१९ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)**

**सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१८)........................................७००.२४**

**एकुण जमा..................................................................... ६२४३७.७७**

**सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................. ६३१३८.०१**

**एकुण खर्च..................................................................... ६२८२७.२८**

**अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१९)....................................३१०.७३**

| अ.नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू ) सन २०१८-१९ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समिती ने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ५५००.०० | १००.०० | | ५६००.०० |
| २ | मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई पासुन उत्पन्न | २८०.०० | ५०.०० | | ३३०.०० |
| ३ | स्थानिक संस्था कर | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| ४ | मुंबई नर्सिग होम ॲक्ट फी | २.०० | ८.०० | | १०.०० |
| ५ | गाळा भाडे | २००.०० | २०.०० | | २२०.०० |
| ६ | गाळे हस्तांतरण फी | १००.०० | १०.०० | | ११०.०० |
| ७ | नोटीस फी/शास्ती | ४८००.०० | ४३९.६० | | ५२३९.६० |
| ८ | अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे | ४००.०० | ५०.०० | | ४५०.०० |
| ९ | मालमत्ता नांव नोंदणी फी | ३५०.०० | ५०.०० | | ४००.०० |
| १० | जाहीरात बोर्ड जागा भाडे | ५०.०० | १०.०० | | ६०.०० |
| ११ | मनपा शाळा भाडे पासुन उत्पन्न | ५१.५० | १०.०० | | ६१.५० |
| १२ | पे ॲण्ड पार्क पासून उत्पन्न | १.३२ | १०.०० | | ११.३२ |
| १३ | मोबाईल टॉवर प्रशासकिय शुक्ल | ८०.०० | १०.०० | | ९०.०० |
| १४ | गॅन्ट्रीज रॉयल्टी | १.८० | २०.०० | | २१.८० |
| १५ | जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट | ७.०० | ८.०० | | १५.०० |
| १६ | घनकचरा संकलन व वाहतुक अंतर्गत मनपा वाहन भाडे पासुन उत्पन्न | ५०.०० | २०.०० | | ७०.०० |
| १७ | अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम | २००.०० | ५०.०० | | २५०.०० |
| १८ | नळ धारकाकडून जमा पाणीपट्टी | २६५०.०० | २००.०० | | २८५०.०० |
| १९ | पाणी विक्री जमा | १२५.०० | ५०.०० | | १७५.०० |
| २० | अनाधिकृत नळ नियमानुकुल करणे | १२५.०० | १००.०० | | २२५.०० |
| | एकुण | १४९७३.६२ | १२४०.६० | ०.०० | १६२१४.२२ |

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू ) सन २०१८-१९ | मा आयुक्तयांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समिती ने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | आकस्मीक खर्च (मालमत्ता कर वसुली विभाग ) | २.२५ | ३.०० | | ५.२५ |
| २ | निवडणूक खर्च | १८०.०० | | १०.०० | १७०.०० |
| ३ | नविन संगणक ,संगणक साहित्य हार्डवेअर, सॉफटवेअर खरेदी (सर्व विभाग) ई गव्हर्नर | २५.०० | | ५.०० | २०.०० |
| ४ | सामाजिक संस्थांना देणगी | ६.०० | २.०० | | ८.०० |
| ५ | सिटी सर्व्हे सावेडी गांवठाण | ३०.०० | १०.०० | | ४०.०० |
| ६ | नविन वाहन खरेदी (अग्निशम विभाग) | ५०.०० | | २०.०० | ३०.०० |
| ७ | अग्निशमन सल्लागार अनुदान | ११.०० | | ६.०० | ५.०० |
| ८ | मोकाट कुत्री बंदोबस्त व दंशावर उपचार करणे | ५०.०० | | २०.०० | ३०.०० |
| ९ | मोकाट जनावरे बंदोबस्त | १५.०० | | ८.०० | ७.०० |
| १० | विद्युत साहित्य खरेदी | ७०.०० | | २०.०० | ५०.०० |
| ११ | नविन इले.पोल ,स्ट्रीट लाईट स्पॅन फिटींग | ७.०० | | ६.०० | १.०० |
| १२ | जुने इले.पोल हलविणे | १०.०० | | ७.०० | ३.०० |
| १३ | सोलर पथदिवे दुरूस्ती | २.०० | | १.०० | १.०० |
| १४ | नविन वाहन खरेदी (वर्क शॅप) | १०.०० | | ५.०० | ५.०० |
| १५ | नविन वाहन खरेदी (रक्त पेढी) | २५.०० | | २०.०० | ५.०० |
| १६ | नविन शववाहीनी ॲम्बुलन्स खरेदी करणे | २०.०० | | १५.०० | ५.०० |
| १७ | हिवताप प्रतिबंधक योजना - कंट्राटी पध्दतीने फरवारणी करणे | ३०.०० | | १०.०० | २०.०० |
| १८ | स्त्री जन्माचे स्वागत करणे | ०.०० | १.०० | | १.०० |
| १९ | खाजगी सुरक्षा रक्षक नेमणे(बा.दे.दवाखाना) | १०.०० | | ५.०० | ५.०० |
| २० | पिंजरे खरेदी(उंदीर व घुस प्रतिबंधक) | ८.०० | | ७.९० | ०.१० |
| २१ | कोंडवाडा बांधकाम करणे | ५.०० | | ४.०० | १.०० |
| २२ | वैरण,चारा खरेदी करणे | २.५० | | १.५० | १.०० |
| २३ | गुच्छ ,हार ,फुले खरेदी | ५.५० | २.०० | | ७.५० |
| २४ | वृक्षरोपण ,वृक्षसंरक्षण व ट्रि गार्ड खरेदी /यंत्र सामग्री ,अवजारे खरेदी करणे | ७.०० | | ६०.०० | १०.०० |
| २५ | बागेतील खेळणी खरेदी व देखभाल | ४.०० | | १.०० | ३.०० |
| २६ | झाडांना टॅक्र व्दारे पाणी पुरवठा करणे | ३.०० | | २.५० | ०.५० |
| २७ | वृक्ष गणना व नंबर टाकणे | १०.०० | | ९.०० | १.०० |
| २८ | शहरातील आढे नाले,नदी पात्रातील अतिक्रमण अडथळे हटविणे,साफसफाई करणे | २२.०० | | ७.०० | १५.०० |
| २९ | मशिनरी/वाहन भाडे | ६५.०० | | ४०.०० | २५.०० |
| ३० | सिना नदी पात्राची हद्द निश्चित करणे व अतिक्रमण अडथळे हटविणे | ९०.०० | | ६५.०० | २५.०० |
| ३१ | वसुली छपाई | ३.०० | | २.०० | १.०० |
| ३२ | गणित - विज्ञान प्रदर्शन | ०.०० | ०.५० | | ०.५० |
| ३३ | मनपा शाळेमध्ये ई लर्निग सुविधा | २२.०० | | १२.०० | १०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | वॉर्ड विकास निधी | ०.०० | २५५.०० | | २५५.०० |
| ३५ | अधिकारी यांचे निवास बांधणे व सोई सुविधा | १५.०० | | १४.०० | १.०० |
| ३६ | स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभूमी | ३०.०० | | २५.०० | ५.०० |
| ३७ | सावेडी भागातील सोनानगर,रासनेनगर,भाग्योदय कॉलनी,अंतर्गत रस्ता मजबुतीकरण ,डांबरीकरण पेव्हींग ब्लॉक बसविणे | ०.०० | १००.०० | | १००.०० |
| ३८ | महापौर शहर विकास निधी | ०.०० | ३००.०० | | ३००.०० |
| ३९ | उपमहापौर शहर विकास निधी | ०.०० | ७५.०० | | ७५.०० |
| ४० | स्थायी समिती सभापती शहर विकास निधी | ०.०० | ७५.०० | | ७५.०० |
| ४१ | सभापती महिला व बाल विकास निधी | ०.०० | २०.०० | | २०.०० |
| ४२ | उपसभापती महिला व बाल विकास निधी | ०.०० | १५.०० | | १५.०० |
| ४३ | सभागृहनेता शहर विकास निधी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| ४४ | विरोधी पक्षनेता शहर विकास निधी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| ४५ | कल्याण रोड रस्ते विकास | ०.०० | ११०.०० | | ११०.०० |
| ४६ | मॉडेल रस्ता विकसीत करणे | ०.०० | १५०.०० | | १५०.०० |
| ४७ | मोबाईल टॉवर उत्पन्नावून विकास कामे करणे | २००.०० | ५०.०० | | २५०.०० |
| ४८ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक भिस्तबाग | १०.०० | १०.०० | | २०.०० |
| ४९ | छत्रपती संभाजी महाराज पुतळा उभारणे | १०.०० | १०.०० | | २०.०० |
| ५० | छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणे | १०.०० | १०.०० | | २०.०० |
| ५१ | प्रभाग ३ नामदेव चौक ते गुंजाळ घरापर्यंत रस्ता मजबुती करणासह डांबरीकरण स्ट्रीट लाईट बसविणे | ०.०० | ३०.०० | | ३०.०० |
| ५२ | सावेडी येथे भाजी मंडई करणे | ०.०० | १००.०० | | १००.०० |
| ५३ | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे अद्यावत जीम ,बांधकाम करणे व व्यायाम साहित्य खरेदी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| ५४ | आगरकर मळा भागातील खोकर नाला पुलाची उंची वाढविणे | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| ५५ | सावेडी उपनगरात हॉस्पीटल बांधणे | ०.०० | १००.०० | | १००.०० |
| ५६ | अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे | २००.०० | ५०.०० | | २५०.०० |
| ५७ | उल्लेखनीय कार्याबद्दल गौरव करणे | १.०० | १.०० | | २.०० |
| ५८ | छत्रपती शाहु महाराज पुतळा उभारणे | ०.०० | २०.०० | | २०.०० |
| | **एकुण** | **१३३९.२५** | **१६४९.५०** | **४०८.९०** | **२५७९.८५** |

सही/-
सभापती, स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका,अ.नगर

**चर्चा :-**

**मा.सभागृह नेता श्री.उमेश कवडे :-** सर्व प्रथम नूतन उपमहापौर यांची नव्याने निवड झाली त्याबद्दल त्यांचा सभागृहाचे वतीने सत्कार करण्यात येत आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने मी नूतन उपमहापौर मा.अनिल बोरुडे यांचे स्वागत करतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** बांधकाम व इलेक्ट्रीक विभागाकडील कर्मचारी यांना मी सूचना करतो त्यांची फाईल तपासून केडीएमसी करा.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** मा.उपायुक्त यांनी ब-याच दिवसापासून प्रलंबित असलेल्या फाईल्स वर सह्या केल्या त्यांची स्थळ पाहणी केली का नाही.

**मा.महापौर मॅडम :-** बजेट सादर होवू द्या त्यांची जबाबदारी आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आपण त्या फाईलवर स्वाक्ष-या झाल्या त्या तुम्ही मागवून घ्या. त्या फाईल केडीएमसी करु नका उपायुक्त नवीन आहेत त्यांचेकडून चूक होण्याची शक्यता आहे. आयुक्त साहेब माहिती द्या.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** उपायुक्त पदावर वरिष्ठ लिपीक श्री.कोंडा यांचे कडे जो कारभार सोपविला आहे तो अतिशय अडचणीच्या वेळेस या पदासाठी कोणी अधिकारी उपलब्ध नव्हते अशा वेळेस दिलेला आहे. ही तात्पुरती व्यवस्था आहे. मी कालच प्रधान सचिन (२) यांना सर्व रिक्त पदाबाबत अवगत केले या पदावर जर अधिकारी मिळाले नाही तर कारभार चालवणे अवघड होणार आहे. याबाबत मा.शासनास अवगत केले श्री.कोंडा यांना दिलेल्या आदेशात कामकाज करतांना नियमानुसार सर्व प्रशासकीय पध्दतीचा अवलंब करावा. केडीएमसी करणेचे वेळी व बील अदा करणेचे वेळी सर्व तपासणी करुनच अदा केली जातील. असा उल्लेख केलेला आहे.

मा.सभापती सौ.जाधव सुवर्णा या मा.महापौर यांना अर्थसंकल्प सादर करतील.

यानंतर मा.सभापती स्थायी समिती सौ.जाधव सुवर्णा यांनी अर्थसंकल्पावरील आपले मनोगत व्यक्त करतील.

**मा.सौ.मालन ढोणे :-** आज २०१९ चा अर्थसंकल्प महासभेला सादर केले. अंदाजपत्रकासाठी प्लॅस्टीकचा वापर केला बजेट ६३८ कोटीचे कापडी पिशवीचा वापर केला असता.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या सूचनेचा विचार करा.

**मा.महापौर मॅडम :-** पुढच्या वेळे पासून कापडी पिशव्यांचा वापर करावा.

**मा.सभागृह नेता श्री.उमेश कवडे :-** सदस्यांना अभ्यासासाठी वेळ द्यावा.

उद्या सकाळी ११.३० वाजता सभा सुरु करावी.

**मा.विरोधी पक्ष नेता श्री.बाळासाहेब बोराटे :-** दोन दिवस सुटी आहे. शनिवारी सभा घ्या.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** महावीर जयंतीची उद्या सुट्टी आहे परवा सभा घ्या. दिवसभर महावीर जयंतीचे कार्यक्रम असतात नगरसेवक त्याला हजर असतात.

**मा.श्री.संजय घुले :-** दोन दिवस वाचायला वेळ द्या.

**मा.महापौर मॅडम :-** उद्या गुरुवार दिनांक २९/०३/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता आजची सभा पुन्हा सुरु होईल.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ मुळ अंदाजपत्रक एकुण जमा मा.आयुक्तांनी सुचविलेले, मा.स्थायी समितीस सुचविलेली तरतुद.

पान नंबर १०२ एकुण जमा ६३१.१८

खर्च बाजू ६२८.२७ लाख.

पान नंबर ३५ भाग महसुली जमा (१) सर्वसाधारण कर ५६ कोटी अपेक्षीत

**मा.श्री.कैलास गिरवले :-** मागील वर्षी आज अखेर झालेला जमा सांगा.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** सन २०१६-२०१७ मध्ये १६ कोटी, सन २०१७-२०१८ नोव्हेंबर पर्यंत १४ कोटी ९६ लाख आज अखेर जमा.

**श्री.झिने, रिव्हीजन विभाग :-** २८/०३/२०१८ अखेर सर्वसाधारण करापोटी १४ कोटी १३ लाख जमा झाले आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** अपेक्षित किती धरले.

**श्री.झिने, रिव्हीजन विभाग :-** ५२ कोटी धरले होते.

**मा.श्री.गणेश भोसले :-** इथेच ४० कोटी कमी पडले. पुर्ण वेडयात काढण्याचे काम चालले आहे. कोणी जबाबदारी घेणार आहेत का. आम्ही एवढे जमा करणार या वर्षी तरी १४ कोटीचे किमान २८ कोटी होतील का?

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** या वर्षीचे सुधारीत उत्पन्न धरले याकरीता एप्रिल पासुन विशेष मोहीम राबवणार, नविन मालमत्ता शोध घेणे, थकबाकीदारांचे १७२ कोटी थकबाकी आहे. त्यातुन फक्त ५६ कोटी अपेक्षीत धरले आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** आता जो ३०-४० कोटीचा फरक पडणार आहे हे कुठे ॲडजेस्ट करणार देणे तर द्यावेच लागणार.

**डॉ.श्री.बोरुडे सागर :-** आपण एवढया मिटींग घेतल्या वसुली का नाही झाली.

**मा.श्री.गणेश भोसले :-** बाळू कांकरीया यांचा मला फोन आला ते पैसे भरायला येणार होते पण आपला कर्मचारी तेथे उपलब्ध नाही असे किस्से आहेत. चार दिवस तो चकरा मारतो तुम्ही पैसे भरुन घेत नाही. भिंगारनाला पेट्रोल पंपाची अशी केस आली. आयुक्त, उपायुक्तांना पत्र दिले आहेत. तुमचे काही ऐकले जात नाही. विकास कामापैकी एकही काम होणार नाही.

**मा.महापौर मॅडम :-** अधिका-यांवर जबाबदारी टाका तर विकास कामे होतील.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सन २०१७-२०१८ चे मुळ आकारणी ५६ कोटी ४१ लाख एवढी डिमांड जमा का होत नाही. आपल्याकडे फक्त १४ कोटी वसुल होतात. उर्वरीत थकबाकी साठी आपण काय करणार.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** आपण शास्ती माफी दिली नाही म्हणुन वसुली झालेली नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** उर्वरीत पैशांची वसुली कधी करणार, कशी करणार. मागचे व आत्ताचे मिळून १०० कोटी रुपयांचे काय नियोजन करणार.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** गेल्या वर्षी फेब्रुवारी ते मार्च अखेर प्रभाग निहाय आपणवसुली अधिका-यांच्या नेमणूका केल्या. अति.आयुक्त व उपायुक्त यांच्या नेमणूका केल्या. दोन महिन्यातील दोन अधिका-यांचे निलंबन यामुळे वसुली होवू शकली नाही ही वस्तुस्थिती आहे.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग :-** ९० वॉर्ड आहेत. ९० वॉर्ड मध्ये ६५ ते ७० कर्मचारी बिगारी आहेत. एखादा नागरीक जर तक्रार घेवून आला तर त्याला नीट माहिती देता येत नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** १४०० कर्मचा-यांपैकी बाकीचे लोक गेले कुठे.

**मा.महापौर मॅडम :-** कर्मचारी एकाच ठिकाणी ब-याच दिवस काम करतात.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** महिला व बालकल्याण विभागातील कर्मचारी श्री.निकम यांचे निधन झाले. त्यांना दोन मिनीटे श्रध्दांजली अर्पण करु.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** वसुली न होण्याचे बरेच कारणे आहेत. शास्ती माफी केली नाही. नागरिकांना आपण सुविधा देत नाही. लाईट पाणी देत नाही. नागरिकांची मानसिकता कशी होते. आपण घरपट्टी का भरायची. दुसरे कारण त्यावेळेस नवीन बांधकामाची नोंद लावण्यासाठी तो ऑफिस मध्ये

जातो कर्मचारी नाही. कॉम्प्युटरवर नोंद नाही. ३-३ वर्षे नोंद लावली जात नाही. अशी सिस्टीम करा ज्या दिवशी त्या नागरिकाला नोंद लावायची त्याच दिवशी नोंद लागली पाहीजे. कर्मचारी नंतर दंडात्मक आकारणी करुन टॅक्स आकारतात. कर्मचा-यांना शिस्त लागली पाहीजे. त्याच्याकडे महानगरपालिकेचा परवाना असतो. मोजमाप झालेले असते. मग अडचण काय.

**श्री.झिने, रिव्हीजन विभाग :-** ओपन प्लॉटची नोंद लावायला ज्यावेळी तो येतो त्यावर १ टक्का आकारणी करुन आपण नोंद लावतो. काही कर्मचारी चांगले काम करतात.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** घोरपडे काका माझ्या वॉर्डातील नागरीक आहेत त्यांचे बाबतीत ही घटना घडली विनाकारण त्यांना दंड आकारला तडवी त्यावेळी प्रभाग अधिकारी होते. सिस्टीम अशी बनवा तो ज्या दिवशी पैसे भरायला तयार आहे त्याच दिवशी बिल दिले पाहीजे.

**नगरसचिव श्री.तडवी :-** मी त्यावेळेस होतो. घोरपडे नावाची व्यक्ती होती. तीन वर्षापासुन त्यांनी चकरा मारल्या मी स्वतः लक्ष घालून त्याची आकारणी केली. व संबंधित कर्मचा-याची वाकळे साहेबांनी बदली केली.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग :-** बेकायदेशीर जर बांधकाम असेल तर दुपटी इतका दंड आकारणे.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** आपण केलेल्या सुचनेची नोंद घेण्यात येईल. प्रभाग अधिकारी यांचेकडुन जर अशी प्रकरणे आली तर कायदेशीर कारणे दाखवा नोटीस देण्यात येईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सही साठी नगरसेवकांना स्वतःला फिरावे लागते. साहेब रजेवर असतात नागरिकांना वाटते रोज महानगरपालिका चालू दिसते मग नागरिकांची कामे होत का नाहीत. आपला नगरसेवक निष्क्रीय आहे असे नागरिकांना वाटते. नगरसेवकांना त्रास होतो. नविन कामांच्या फाईलची सध्याची व्यवस्था चांगली करा. एका प्रकरणाला तीन-चार महिने लागतात. आमची कामाची तळतळ आहे.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** गेल्या दोन तीन महिन्यात ब-याच अधिका-यांवर कार्यवाही झाल्या. दोन्ही उपायुक्त नाहीत. प्रभाग अधिकारी यांचेकडे प्रभारी कार्यभार दिला आहे. त्यांनी त्यांचेकडील काम काढुन घेणे बाबत निवेदन दिले आहे. अधिका-यांची पदे रिक्त आहेत. खालच्या अधिका-यांकडून जी कामे करुन घेतली जातात ती होत नाहीत. आम्ही शासन स्तरावर कळविले आहे.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** महानगरपालिका काम करते जनतेचे प्रेम आहे. दिशाभुल केली जाते. दुसरेच श्रेय घेतात.

**मा.महापौर मॅडम :-** तुमचे म्हणणे थोडक्यात मांडा म्हणजे सर्वांना बोलण्याची संधी मिळेल.

**मा.उपमहापौर श्री.बोरुडे :-** कुमार वाकळे यांनी जो प्रश्न मांडला तो खरच गंभीर आहे. अधिकारी जागेवर नसतात.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** या अंदाजपत्रकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रस्तावासाठी २० लाख रुपयांची तरतुद होती. संभाजी महाराजांच्या पुतळयासाठी किती लाखाची तरतुद होती.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** २० लाखाची तरतुद आहे

**मा.श्री.कुमार वाकळे :-** संभाजी महाराजांचा पुतळा १० वर्षापुर्वीचा आहे मग त्यासाठी २० लाखाची तरतुद कशी केली. छत्रपती शिवाजी महाराजांसाठी ५० लाखांची तरतुद करा. हेडवर तशी तरतुद करा.

**मा.श्री. सचिन जाधव :-** मान्य करण्यास हरकत नाही.

**मा.महापौर मॅडम :-** सभागृहाच्या सर्वानुमते शिवाजी महाराजांचे पुतळयासाठी सुशोभिकरणाला ५० लाखाची तरतुद करण्यात यावी. रोखीने तरतुद करावी.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** विकासभारातुन तरतुद करा. जेवढे आपण पुतळे उभारणार त्या सर्व पुतळयांसाठी विकासभार निधीतुन तरतुद करा. विकास योजना किंवा रस्ते यातुन २५% घेता येतील. ७५ टक्के भुसंपादनातुन करता येतील.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** आहे त्या हेडमध्ये ठेवले तरी चालेल. ज्येष्ठता प्रमाणे देयक तात्काळ अदा करणे असा ठराव केल्यास त्या प्रमाणे कार्यवाही करता येईल.

**मा.महापौर मॅडम :-** देयके, प्राधान्याने देणे बाबत कार्यवाही करावी.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** विकास भारातुन पैसे कुठे खर्च करु शकतो. २ नंबर झोन मध्ये भरलेला पैसा इतरत्र वापरु शकतो का ?

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** बंधन नाही. शहरात आवश्यकते प्रमाणे कुठेही खर्च करु शकतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** दुसरी रोख स्वरुपाची तजविज नाही का.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मोबाईल टॉवर मधुन देणे जमते का ?

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मोबाईल टॉवर मधुन ५० लाखांची तरतुद करा.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** तसा संबंधित विभागाकडुन प्रस्ताव येईल तसे करु.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** अति

**मा.श्री.योगीराज गाडे :-** छिंदम यांच्या निधीतुन तरतुद करण्यांत यावी.

**मा. महापौर साहेब :-** मोबाईल टॉवर मधून विषय घेण्यात यावा.

वृक्षकर

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** आपण वसुलीकडे वर्षभरात लक्ष दिले नाही. उत्पन्न वाढविणेसाठी प्रयत्न केले नाही, आपण बजेटमध्ये तरतुदी करतो वाढवतो. केडगाव , बुरूडगांव उदयान विकासीत करणे याकामी तरतुद पुढे "शून्य" झाली. आपल्याला जी कामे करायची त्यावर फोकस करणे MRTP ॲक्ट नव्याने लागू झाला त्यामध्ये अनाधिकृत बांधकामे दंड आकारून नियमानुकूल करणेची तरतुद आहे.

**नगररचनाकार श्री.धोगंडे :-** दिनांक ०७/१०/२०१७ ला महाराष्ट्र शासनाने जी.आर. पारीत केला जी.आर. मागवतो.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** ते कलम लागू केला का.

**नगररचनाकार श्री.धोगंडे :-** पेपरमध्ये दिले. संख्या खुप मोठी आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** अनधिकृत बांधकामापासून किती उत्पन्न मिळू शकते.

**नगररचनाकार श्री.धोगंडे :-** योग्य ते नियोजन पुढच्या वर्षी करणार आहे. आता रूपये ५ कोटीची तरतुदी केली आहे.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** किती बांधकामे रेग्युलराईज केले.

**नगररचनाकार श्री.धोगंडे :-** अजुन एकही बांधकाम रेग्युल राईज केले नाही. दि. ७/१०/२०१७ चा जी.आर. मध्ये मा. शासनाने बांधकाम व्यावसायिकाला सवलती दिल्या त्याच्याकडून दंड आकारून बांधकाम नियमीत करता येईल.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** छोटया पेपर ऐवजी मोठया पेपरला जाहिरात द्यायला पाहिजे

**मा.आयुक्त साहेब :-** शासन निर्णय वृत्तपत्रात प्रसिध्द केला आहे.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** मी सकाळचे १० पेपर व संध्याकाळचे ४ असे एकुण १४ पेपर रोज वाचतो माझ्या वाचण्यात जाहिरात आली नाही.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** आयुक्त साहेब कडे सविस्तर प्रस्ताव ठेवला जाहीर प्रकरणाला मंजुरी घेतली . दि.२२/१२/२०१८ ला प्रसिध्दी विभागाला पाठविला.

**मा.श्री. सचिन जाधव :-** जास्तीत जास्त प्रसिध्दी दयायला पाहिजे होती ते झाले नाही नगर टाईम्सला जाहिरात दिल्याचे आठवते.

**मा.श्री. सचिन जाधव :-** सकाळ व संध्याकळाचे सर्व वृत्तपत्रात जाहिरात देण्यात यावी.

**नगररचनाकार श्री. धोगंडे :-** एप्रिलमध्ये पत्रकार परिषद घेवून मा.आयुक्त साहेब जाहीर करणार आहेत वसुली मुळे सध्या घेतली नाही.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** किती प्रकरणे आली.

**नगररचनाकार श्री. धोंगडे :-** ७-८ अर्ज आतापर्यत आले आहेत स्क्रुटीनी चालू आहे.

**मा.विरोधीपक्ष नेता श्री.बाळासाहेब बोराटे :-** धार्मिक क्षेत्राच्या जवळचे बांधकामे या जी.आर. नुसार नियमानुकुल होणार का ? ३०० मी.मधील घरे घेवू नये असा जी.आर.मध्ये उल्लेख आहे का ?

**नगररचनाकार श्री. धोडंगे :-** होवू शकणार नाही

हा जी.आर. आम्ही सर्वांना सक्युलेर करतो.

आपण ५२-५३-५४ च्या ब-याचशा नोटीसा दिल्या त्या पाडण्या योग्य शेकडो केसेस आहेत त्यावर कारवाई न झाल्याने हा रिस्पॉन्स मिळत नाही.

**मा.श्री. सचिन जाधव :-** आपण ३- ३ पट टॅक्स आकारतो ते तयार होतील.

**नगररचनाकार श्री. धोंडगे :-** सभागृहाला आश्वासीत करतो सर्वांना जी.आर. सक्युलेट करतो, पत्रकार परिषद लवकरच घेण्यात येईल.

**मा. महापौर मॅडम :-** सर्व पेपरला जाहिरात दया.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** किती लोक कंप्लीशन घेतात.

१०० बांधकाम परवानग्या दिल्या तर त्यापैकी २५ लोक कंप्लीशन घेतात. अशी प्रकरणे सुध्दा यामध्ये येतात.

**नगररचनाकार श्री. धोंगडे :-** ५२.५३ .५४ नोटीसवर धडक कारवाई केली पाहिजे प्रभाग अधिकारी यांना प्रशिक्षण देवून त्यांचेमार्फत जास्तीत जास्त नोटीस दिल्या पाहिजेत.

**मा.विरोधीपक्ष नेता श्री. बाळासाहेब बोराटे :-** आता बजेटमध्ये तरतुद काय करणार

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** बजेटमध्ये टोकन तरतुद केली आहे वृत्तपत्रात आपण प्रकरण प्रसिध्द केले आहे.

**मा.विरोधीपक्ष नेता श्री.बाळासाहेब बोराटे :-** दंडात्मक आकारणी कशी केले जाते. स्क्वेअर फुटावर केली जाते का मीटरवर केली जाते ?

**नगररचनाकार श्री. धोंगडे :-** नोटीसीशेन मोठे आहे.

जे आपल्याकडे पैसे असतील त्यांना घोषीत करता येईल पुढील प्रकारचे बांधकाम नियमित करता येणार नाही.

१. कुठल्याही इतर कायद्यान्वये बंधन असेल, २. बफर झोन, ३. खराब बिल्डींग, ४. इतर विभागात असेल उदा :- औद्योगिक झोन मध्ये.

**नगररचनाकार श्री. धोंडगे :-** दवाखान्याचे सर्व हॉस्पीटला नोटीस दिल्या उक्त ३५ प्रकरणे आली आहे नोटीस मध्ये आपण ६ महिन्याची मुदत दिले आहे प्रकरण नोटीस पाठवू.

**मा.विरोधीपक्ष नेता श्री.बाळासाहेब बोराटे :-** कारवाईचा बडगा दाखवायला पाहिजे.

**मा.श्री. कैलास गिरवले :-** पुन्हा एकदा संपर्क साधावा.

**मा.श्री. संजय घुले :-** संघटनेला पत्र दया.

**मा.श्री. सचिन जाधव :-** फक्त हॉस्पीटलच नाही, हॉटेल आहेत.

**मा.विरोधीपक्ष नेता श्री. बाळासाहेब बोराटे :-** एका गुठयांची बांधकामाला नोटीस देतो मग यांना नोटीस का दिली नाही.

**नगररचनाकार श्री. धोंडगे :-** हायकोर्टाचा निर्णय होता त्यानंतर परत एकदा नोटीस देतो. नोटीस दिल्या सर्व प्रोसेस झाली आहे.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** आपल्याकडचे ४-५ इंजि. चे प्रमोशन का करत नाही. बिंदूनामावली मंजुर झाली आहे वृत्तपत्रात प्रसिध्द करा.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** बिंदूनामावली अपडेट होवून आली आहे.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री. लहारे :-** वर्ग १-२ व ३-४ बिंदूनामावली मंजुरी आलेली आहे

मा.श्री.दिलीप सातपुते :- किती दिवस इंजि. ना प्रमोशन दयायला लागेल.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री. लहारे :-** साधारण एक महिना लागेल १५ दिवस सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द होईल निवड समितीची तारीख अजुन मिळाली नाही.

**मा.श्री. दिलीप सातपुते :-** कोण कोण आहेत निवड समितीत मा. शासनाचा कोणते अधिकारी नाही सोमवर संध्याकाळापर्यत सर्व प्रक्रिया झाली पाहिजे.

**मा.श्री. अनिल शिंदे :-** अनधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे यातुन जो पैसा उपलब्ध होईल त्यातून सर्व नगरसेवकांना रूपये १२ लाख मंजुर केला तो यातून करा मागचे ही करा रूपये २२ लाखाचे रोखीने पैसे उपलब्ध झाले पाहिजे सर्वांना ७३ नगरसेवकांना मिळले पाहिजे स्थायी समितीने रू. १२ लाख केले सर्व सभागृहाचे वतीने विनंती.

सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ मधील सर्व बीले निघाले पाहिजे रोखीने बीले दिले गेले पाहिजे रूपये १२ लाख तरतुद करा इतर कामे करू नये.

**मा.श्री. संपत बारस्कर :-** असा आपण नगरसेवक निधीतून रोखीने करणेबाबत ठराव केलेला आहे.

**मा.महापौर मॅडम :-** अनधिकृत बंद बांधकाम नियमानुकुल करणे त्यातुन सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ चा नगरसेवकांचा निधी देण्यांत यावा.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** १० एप्रिलपर्यंत अधिका-याची पदोन्नती केली जाईल.

**मा.श्री. अभिषेक कळमकर :-** प्रॅक्टीकली सांगा. १०एप्रिलला होईलच का

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** १० एप्रिलापर्यंत होईल.

**मा.महापौर मॅडम :-** आयुक्त साहेब जबाबदारी घेतात.

**मा.श्री. सचिन जाधव :-** मागच्या निवड समितीत तडवी साहेब व मुख्य लेखा परिक्षक यांचे चर्चेमुळे मिटीग घेण्यात आली नाही. मिटींग परत बोलविण्यांत यावी.

**मा.प्र.उपायुक्त श्री. तडवी :-** कर्मचा-याच्या १२-२४ वर्षाचे कालबध्द पदोन्नतीसाठी बैठक झाली. खरात मुख्यलेखापरीक्षक, यांनी लेखाचा जी.आर. उपलब्ध नसल्यामुळे मिटींग घेण्यात येणार नाही. त्यामुळे बैठकीत निर्णय झाला नाही.

**मा.श्री. अभय आगरकर :-** चतर्थश्रेणी कर्मचा-यांची जवळजवळ ७०० कर्मचा-यांची ऑर्डर घेवून आले पण आपल्याकडून कार्यवाही होत नाही.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री. लहारे :-** वर्ग ३ -४ ची बिंदूनामावलीला नुकतीच मंजुरी मिळाली आहे.

**मा.सौ. दिपाली बारस्कर :-** माझा वृक्ष करा बाबतचा विषय आहे.

वृक्ष आपण लावतो आपण झाडे लावतो का ? झाडे लावली तर त्याला पाणी देतो का लोकांना पाणी द्यायला सांगितले तर आम्हाला प्यायला पाणी नाही आम्हाला झाडाला पाणी दयायला सांगतात असे म्हणतात.

**उदयान अधिक्षक श्री. गोयल :-** लोक सहभागातून झाडे लावतो लोक सहभागातून झाडे लावण्यात आल्याने आपण त्यांनाच पाणी घालण्यास सांगतो.

**मा.सौ. दिपाली बारस्कर :-** मग बजेटमध्ये पाणी घेण्यसाठी तरतुद का करतो आपले पालिका झाडांसाठी काहीच करत नाही. वर्षभरात काहीही केले जात नाही.

**उदयान अधिक्षक श्री. गोयल :-** झाडे लावयची प्रोसेस आपण जुन, जुलै मध्ये राबवतो पावसावरच अवलंवून असते. नागरिकांच्या सहकार्याने १ हजार झाडे लावले महाराष्ट्र शासनाने २ हजार झाडांचे उद्दीष्ट ठरवून दिले आहे.

**मा.सौ. दिपाली बारस्कर :-** वृक्षतोडीचे ऑडीट केले जात नाही वृक्षकर रद्द करावा.

**मा.श्री.विक्रम राठोड :-** बागेत सुध्दा झाडे लावली नाही. सिध्दीबागेत आम्ही झाडे लावली. हे म्हणतात १५ हजार झाडे लावली, कुठे लावली. यांना विचारणा करा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** वृक्ष गणनेतील झाडांची यादी वाचन केली सर्व खोटी माहिती देतात. दिशाभुल करतात मी झाडांची गणना करणे बाबत सांगीतले पण अजुन होत नाही. ९४ स्क्वे.मीटर नगरचे क्षेत्र आहे. त्यात २५ हजार झाडे लावली.

**उद्यान अधिक्षक श्री.गोयल :-** माहिती अधिकारातील आपणाला दिलेली माहिती नगरपालिका असतांनाची आहे. तेंव्हा प्रशिक्षीत कोणताही कर्मचारी नव्हता. सफाई कर्मचा-या मार्फत शिर गणती केली आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** दोन लाख झाडे पाहिजेत आयुक्त साहेब गांभीर्याने घ्या. मी स्वतः माझ्या वॉर्डात वृक्षगणना करणार आहे.

**उद्यान अधिक्षक श्री.गोयल :-** म्हसे यु.जी. हे वृक्षप्राधिकरणाचे काम पाहतात शासनाने २६ हजार झाडे लावण्याचे उद्दीष्टय दिले आहे. आपल्या सहकार्याने ही मोहीम यशस्वी होईल. माझ्या काळात ५ ठिकाणी झाडे तोडल्याचे निदर्शनास आले त्यांचेवर कारवाई केली आहे.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** उद्यान विभागामध्ये या विषयाची माहिती असणारे तज्ञ कर्मचारी पाहीजे ते नाही कर्मचा-यांचे उपस्थितीचा आम्ही आढावा घेतला आणखी अधिकारी देता येतील का हे पाहून हा विभाग सक्षम करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** झाडांना पाणी देण्यासाठी टँकर उपलब्ध करुन दिला पाहीजे. फोन न करता टॅकर आला पाहीजे. मागच्या वर्षी टँकरवर झाडांसाठी किती खर्च झाला.

**मा.महापौर मॅडम :-** टँकरची व्यवस्था केली पाहीजे.

**उद्यान अधिक्षक श्री.गोयल :-** टँकरला खर्च झाला परंतु बीले अकौंटला गेली नाही.

**मा.श्री.सचिन जाधव :-** ७० लाखाचे बजेट तरतुद १० लाख कशी झाली गार्डन विभागाची मागणी किती पाहीजे. गार्डन विभागाला तरतुद करा. गोयलची बदली करा.

**उद्यान अधिक्षक श्री.गोयल :-** ८० ते ९० लाख रुपये लागणार आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** वृक्ष प्राधिकरण समितीने यावर लक्ष ठेवावे. गार्डनवर खर्च न करता झाडावर खर्च करा.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** उद्यान विभागाचा कारभार अत्यंत असमाधान कारक आहे. त्यांनी गेल्या वर्षभरामध्ये कामाची तपासणी करुन सर्व सदस्यांनी गांभीर्याने मुद्दे मांडले आहेत.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** ४ नगरसेवक व इतर असे ७-८ अधिकारी यांची कमीटी नेमून गणना करा.

**मा.श्री.सचिन जाधव :-** समितीमध्ये सर्वच पक्षाचे सदस्यांचा समावेश करा. पहिली कमिटी बरखास्त करा. बजेट वाढवा ३३ पान नंबर वर तरतुद आहे. प्रत्येक झोन मधील २ नगरसेवक घ्या.

**मा.महापौर मॅडम :-** ७० लाख तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** चौकशी होईपर्यंत आजारपणाची रजा देवू नका.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** सभागृहात शिस्तीचे वातावरण ठेवा मध्येच उठून बोलू नका.

**मा.महापौर मॅडम :-** ही समिती बरखास्त करुन सर्व पक्षीय समिती गठीत करा. वृक्ष गणनेचे आयुक्त साहेबांनी आदेश द्यावेत. वृक्ष तोडलेल्या बाबत आयुक्त साहेब चौकशी करतील.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** झाडे नविन खरेदी केली पाहीजेत. ३-३ ४-४ वर्षाची झाडे खरेदी करावी त्या साठी तरतुद करा सध्या आपण लहान लहान झाडे घेतो ते वाढायला वेळ लागतो.

सावेडी उपनगरातील व शहरातील पॅचींग प्रश्न प्रत्येक प्रभाग समितीसाठी वेगळी तरतुद करावी. प्रत्येक प्रभाग समितीसाठी वेगळे टेंडर काढावे आपण संपूर्ण शहरासाठी पॅचींगचे टेंडर काढतो. शहरात पॅचींग होते. उपनगरात होत नाही. वेगळी पैंशाची तरतुद करा. त्याच प्रभाग समितीत काम झाले पाहीजे माहिती घ्या. शहरातल्या महत्वाच्या रस्त्यांवर पॅचींगचे काम केले जाते.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** रेल्वे स्टेशन रस्त्यावरील पॅचींग संदर्भात मा.आयुक्त साहेब यांना मी भेटलो पण अद्याप काम झाले नाही.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** आपण मला भेटलात, मी शहर अभियंत्यांना आपली पत्रे दिली. सावेडी, शिवनेरी चौक ते रेल्वेस्टेशन व मल्हार चौक ते रेल्वेस्टेशन पॅचींग मागणी होती. पॅचींगचे निविदाकाराचे बील न दिल्याने हे काम करता आले नाही. चालू वर्षातील निविदेचे ५० ते ६० लाखाचे बील अकौंटला सादर केले पण अद्याप देयक अदा केलेले नाही.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** विकास भाराचे पैसे का वापरले नाही.

**श्री.सोनटक्के :-** मोबाईल केबल खोदाई पोटी जी रक्कम महानगरपालिकेस मिळाली त्यातुन ही कामे केली आहेत.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** आज जर तुम्ही पॅचींगचे केडगांवचे काम केले नाहीत तर मी आपणाला केबीनमध्ये बसू देणार नाही.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** माझेकडून असा कुठलाही भेदभाव मी केला नाही.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** ठेकेदाराला जर त्याचे बील लवकरात लवकर दिले तर काम करुन घेता येईल. हे पैसे पालिकेच्या फंडातील नाही. केबल खोदाई पोटी प्राप्त झ ाालेल्या रक्कमेतून बील आहे. मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे साहेब काढुन देतील. अजुन २० लाखाचे काम बाकी आहे. त्यातुन या नगरसेवकांचे काम करुन घेण्यात येईल. ज्या ठिकाणी रस्ते पॅचींग करणे गरजेचे आहे तेथील पॅचींगची कामे ८-१० दिवसात चालू होईल.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** पाणी पुरवठा विभागाचे बील लवकर निघत नाही. कॅफो चेक काढत नाही.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** ६ ते ७ महिने झाले देखभाल दुरुस्तीची बीले निघत नाहीत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** किरकोळ लिकेजची कामाची बीले कॅफोंनी अदा न केल्याने नगरसेवकांना खिशातुन रक्कम द्यावी लागते. यासाठी स्वतंत्र हेड करा. स्वतंत्र पैसे द्या वार्षिक १ कोटी द्या शहर अभियंता यांनी त्यांच्या अधिकारात काढा. टँकरशी माझा काडीमात्र संबंध नाही. गिरवले मामांनी प्रुव्ह करुन द्यावे मी नगरसेवक पदाचा राजीनामा देईल.

**मा.महापौर मॅडम :-** पाणी पुरवठा विभागासाठी स्वतंत्र तरतुद करण्यांत यावी व यासाठी रक्कम रु.१ कोटीची तरतुद करण्यांत यावी संपूर्ण शहरासाठी झोन वाईज वाटुन देण्यात येईल. पाईप लाईन जर विळद घाटात फुटली तर कोणत्या झोनमध्ये करणार पूर्ण वर्षभरासाठी ५० लाखाची आहे. गेल्या वर्षासाठी ६० ते ७० लाख खर्च झाला आहे. पाणी पुरवठा विभागाचे म्हणणे आहे. त्यामुळे ही तरतुद वाढवली.

**मा.श्री.सचिन जाधव :-** ५.५ हजाराची किती दुरुस्तीची बीले काढली.

**अभियंता श्री.काकडे :-** पाणी पुरवठ्याचे साहित्य खरेदी व रिपेअर साठी ५० लाख तरतुद केली. रक्कम रुपये २० लाख तरतुद वाढवली ही तरतुद स्वतंत्र खात्यात ठेवावी आमचे बील तिथे गेल्यानंतर बील निघाले पाहीजे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** पाईप खराब झाले तर कशातुन खर्च करणार.

**अभियंता श्री.काकडे :-** रिपेअरींग मधुन खर्च केले जाणार.

**मा.श्री.सचिन जाधव :-** आम्हाला नगरसेवक निधीतुन बीले टाकायला सांगीतली ती यातुन खर्ची टाका.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे जीमसाठी ५० लाखाची मा.स्थायी समितीने तरतुद केली आहे. त्याठिकाणी जीम बांधता येईल का.

**अभियंता श्री.सोनटक्के :-** लायब्ररी आहे. जीमचा प्रस्ताव आमच्या कडून गेला नाही तपासून पहावे लागेल. या ठिकाणी जीम करता येईल का नाही स्थायी समितीने प्रस्ताव सूचविला.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** अभ्यासिका व लायब्ररीसाठी यापूर्वी ठराव झाला आहे. संपूर्ण योजनेतुन राज्य शासनाकडून निधी उपलब्ध होवू शकला. त्या ठिकाणी जीम बांधता येणार नाही. मागचे ठराव बघा. स्मारक कशासाठी बांधले त्यामागचा उद्देश तपासा.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** आंबेडकर स्मारकाचा उद्देश लक्षात घेता त्या ठिकाणी जीम बांधता येणार नाही. नाविन्यपूर्ण योजनेत कलेक्टर साहेबांनी आम्हाला प्रस्ताव मागीतला आहे. तसा प्रस्ताव केडगावच्या जागेचा कालच दिला.

**अभियंता श्री.बल्लाळ :-** आंबेडकर स्मारकाची जागा नॅशनल हायवे पासून १६ मीटरवर असल्याने या ठिकाणी बांधकाम नव्याने करता येणार नाही. लायब्ररी साठी द निधी वळवता येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** त्यावेळेस शासनाकडुन २० कोटी निधी मिळाला त्यावेळी सुधारीत ५० लाखाची तरतुद केली. विभागीय आयुक्तांनी मंजूरीला नकार दिला. सुशोभिकरणासाठी ६१.५० लाख निधी वापरता येईल कांबळे यांना बोलावून घेवून चांगले शिल्प बसवा.

**मा.महापौर मॅडम :-** स्टँडींगचा प्रस्ताव रद्द करुन सुशोभिकरण करण्यासाठी ५० लाख रुपये खर्च करण्यांत येईल.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** सर्व थोर पुरुषांचे पुतळयांकरीता मोबाईल टॉवर मधुन खर्च घेण्यांत यावा.

**मा.महापौर मॅडम :-** या संदर्भात आम्ही जिल्हाधिकारी साहेब यांचेशी चर्चा केली आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळासाठी सध्याचे पुतळया मागील पूर्ण जागा महानगरपालिकेची आहे. यापूर्वी ब-याच वेळा चर्चा झाली अतिक्रमण विभागास याची माहिती आहे माहिती द्या.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** मार्केट यार्ड चौकामध्ये पुतळया मागील जागा महानगरपालिकेची आहे उता-यावर महानगरपालिकेचे नांव आहे. जिल्हा न्यायालयात २-३ अपिल केले आपले बाजुने निकाल झाला. ना.हायकोर्टात त्यांनी अपील केले ते प्रलंबित आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** स्थगीती दिलेली नसेल तर आपण का थांबतो. लाखो रुपयांचे उत्पन्न त्या जागेपासून होत आहे. आयुक्त साहेब गांभीर्याने घ्या. संपूर्ण जागा ताबडतोब मोकळी करा बाबासाहेब आंबेडकरांचे पुतळयासाठी ही जागा भरपुर आहे.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** जिल्हा न्यायालयात न्यायालयाचे निदर्शनास सर्व पुरावे आम्ही निदर्शनास आणले. स्थगीती बाबत कायदेशीर सल्लागार यांचा अभिप्राय घेण्यात येईल. ॲड.पी.एम.शहा यांची स्पेशल नेमणूक आपण केली आहे. स्थगीती होती म्हणून कारवाई करता आली नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** पंतप्रधान आवास योजनेतील घरे बांधण्यासाठी लाभ धारकांचे ३०० ते ४०० चे फुट प्लॉट आहेत. बांधकाम परवानगीसाठी अडचणी येते धोंगडे साहेबांनी त्यांना बांधकाम करता येईल अशा प्रकारचे धोरण राबवले तर त्यात काही करता येईल.

**नगररचनाकार श्री.धोंगडे :-** वाकळे साहेबांचा मुद्दा रास्त आहे. प्रधान सचिव नवि यांचेशी पत्र व्यवहार केला आहे. पान नं ७ जी.आर नुसार बसविता येतो का ते पाहून पुन्हा अर्ज करण्यासाठी सांगा. नियमात बसत असेल तर मंजूरीचा विचार करु.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** प्रभाग समितीची पुराचे पाणी काढतांना खर्चाची मर्यादा कमी असल्याने खर्च करता येत नाही. तरतुद वाढवुन घ्या.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** प्रत्येक प्रभागात रु.५० हजाराची आपत्कालीन साठी तरतुद केली आहे. जास्तीच्या खर्चाची बिले त्यांनी दिली तर करता येईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सारसर प्रभागासाठी किती तरतुद लागेल ते सांगा.

**मा.महापौर मॅडम :-** आपत्कालीन अशी परिस्थिती पावसाळयाच्या निर्माण झाली तर प्रत्येक प्रभागासाठी ५ लाखाची तरतुद करावी.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** अहिल्याबाई होळकर स्मारकासाठी ५० लाखाची तरतुद करावी. सीसीटीव्ही कॅमेरे ० टक्के तरतुद झाली आहे. प्रमुख चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे व इतर कॉटेज कॉर्नर, या हेडसाठी तरतुद केली नाही. उद्यानासाठी ५० लाख करावी. बोल्हेगांव नागापूर भागासाठी, प्रभाग क्रमांक १ मधील रस्त्यांचे मागणी साठी मी आंदोलन केले त्यावेळी या बजेटमध्ये तरतुद करण्यांत येईल अशी प्रशासनाने मला कळविले परंतू या बजेटमध्ये कुठेही उल्लेख नाही.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** आपल्या रस्त्यांसाठी ४ कोटी तरतुद खर्च होतो. मिळणारे व खर्च याचा मेळ पाहता तरतुद नावानिशी झालेली नाही. परंतू महासभेने जर तशी तरतुद केली तर कार्यवाही करता येईल.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** प्रभाग निहाय तरतुद केलेली नाही प्रशासनाने सुचविलेल्या तरतुदीमध्ये प्रभाग निहाय तरतुद सुचविली नव्हती स्थायी समितीने या तरतुदी केल्या आहेत.

**मा.महापौर मॅडम :-** प्रभाग क्रमांक १ मध्ये जसा जास्त निधी उपलब्ध होईल तसतसे रस्ते घेण्यात येतील.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** मा.शासनाने सावेडी नाट्य संकुलासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे. निधी मंजूर झाला आहे. सन २०१५ ला उद्घाटन झाले. जवळ-जवळ त्यावेळेला डीपीआर नुसार ८-९ कोटी खर्च येणार होता. आता १००० सीटची कॅपीसिटी मंजूर झाली शासनाचे मी अभिनंदन करतो महानगरपालिकेचा हिस्सा मिळाल्यास या योजनेला चालना मिळेल. एकच मागणीची ही ग्रँड मंजूर केली. महानगरपालिकेच्या बजेट मध्ये महानगरपालिका हिश्याचे या बजेटमध्ये मोबाईल टॉवर मधुन १ कोटी केले तर निधी शासनाकडून मिळेल. महासभेत ही तरतुद करावी.

**मा.महापौर मॅडम :-** मा.शासनाकडून निधी आपल्याला उपलब्ध करुन घ्यायचा. प्रत्येक वेळी मी रुलिंग देवू शकत नाही. बजेटमध्ये २ कोटीची तरतुद केलेली आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** जो तो उठतो टॉवरच्या निधीतुन तरतुदीची मागणी करतो उत्पन्न किती मिळणार ते तरी सांगा. सभागृहात गोंधळ

**मा.महापौर मॅडम :-** आपण जो विषय घेतला तो बजेटमध्ये आलेला आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** शासनाला लगेच पत्र देण्यात यावे म्हणजे या विषयाला चालना मिळेल.

**मा.महापौर मॅडम :-** बजेट विषय पुढे चालू करा.

**मा.सौ.उषा ठाणगे :-** रस्त्याचे बजेट तरतुद करण्यासाठी, पुलासाठी तरतुद करावी.

कल्याण रोड - २० लाख

नालेगांव - ७० लाख

घरकुल - २० लाख

वारुळाचा मारुती - ५० लाख

२०१८-२०१९ मध्ये बजेट मध्ये तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** केडगांव मध्ये अग्नीशमन दल केंद्र २००९ साली उद्घाटन केले जवळपास १० लाख त्यासाठी खर्च केले. अग्नीशमनची गाडी घेण्यासाठी मागणी केली. आपण ३० लाखाची तरतुद केली ती कमी आहे. यासाठी ५० लाख तरतुद करावी.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-** आमची मागणी ५० लाख होती. नवीन वाहन खरेदीची होती नंतर ३० लाख तरतुद केली एवढया रक्कमेत वाहन येणार नाही. आणखी ५० लाख तरतुद करावी.

**मा.महापौर मॅडम :-** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार ५० लाख तरतुद करण्यात यावी. बजेट न वाचता झालेले रुलिंग अशी नोंद करा.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** भाग्योदय मंगल कार्यालयाची दुरावस्था झाली आहे. त्यासाठी ८ लाख मंजूर झाले पण काम सुरु झाले नाही ते का सुरु झाले नाही.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** भाग्योदय मंगल कार्यालयासाठी वर्क ऑर्डर झ ाालेली नाही पालिकेचे पैसे मिळत नाही म्हणुन ठेकेदार काम करत नाही. ठेकेदाराला बोलावून या महिन्यात काम करुन घ्यायला सांगीतले जाईल. काम करीत नसेल तर निविदा रद्द करुन नव्याने निविदा मागवू एप्रिल अखेर नव्याने निविदा मागवून काम सुरु होईल.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** केडगांवमध्ये मानधनावर किती वायरमन भरले आहेत.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** महानगरपालिकेने मानधनावर एकुण १२ कर्मचारी नेमले आहेत केडगाव मधील सांगता येणार नाही. गेल्या तीन दिवसा पासून सर्व वायरमन हजर झाले आहेत.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** फोन लावा.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** आपण ३-४ महिन्याचे पेमेंट केले.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** हजर झाले नसतील, तर त्यांना हजर व्हायला सांगतो. पेमेंट केलेले आहे.

**मा.महापौर मॅडम :-** १२ कर्मचारी आहेत त्यांचे पेमेंट थकवू नका.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** कचरा डेपो कडे जाणा-या रस्त्यावर गजराज फॅक्टरी जवळ एक पुल आहे या बजेटमध्ये या रस्त्याची तरतुद करा रस्त्याचे काम सुरु झाले की बंद पडू नये पुढचा रस्त्यासाठी निधी नसल्याने काम बंद आहे. भिस्तबाग चौक महाल ते कचरा डेपो पर्यंत रस्त्याची योग्य ती तरतुद करा. सावेडी स्मशानभूमीसाठी जागा खरेदीसाठी तरतुद करावी.

**मा.सौ.उषा ठाणगे :-** यांनी पत्र वाचन केले सार्वजनिक रस्त्यासाठी २ कोटी तरतुद करावी साईराम सोसायटी.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** मागच्या वेळी छिंदमचा ठराव केला शासनाकडे पाठविला शासनाचे काही उत्तर आले का. काही सदस्य म्हणाले आम्ही नाशिकला जावून राजीनामा आणतो.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** रिमांयडर पाठवावे लागेल.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** पान नंबर ३५ वसुली विभाग.

**मा.डॉ.सागर बोरुडे :-** आयुक्त साहेब आपण शासनाकडे शास्ती माफीचा प्रस्ताव पाठविला त्याचे काय झाले.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** अंदाजपत्रकाचे वाचन केले.

वसुलीचे उत्पन्न ७२ कोटी

भावी उत्पन्न ११ लाख ९० हजार अपेक्षीत उत्पन्न इतर ७ कोटी २५ लाख.

अंदाजपत्रक ३ भागामध्ये वर्गिकरण केले आहे.

१- महसुली जमा खर्ची ,

२- भांडवली जमा खर्ची ,

३- दुबेरजी जमा खर्ची

बांधील खर्च - अत्यावश्यक खर्च

पान नं.२ बांधील खर्च वाचनकेले एकुण बांधील खर्च १२४ कोटी ३ लाख. अत्यावश्यक खर्च तरतुद वाचन केले- प्रत्येक बाब निहाय अ.नं.१ ते २३

एकुण अत्यावश्यक खर्च ४९ कोटी.

एकुण २१२ कोटी २७ लक्ष खर्च

**मा.विरोधी पक्ष नेता श्री.बाळासाहेब बोराटे :-** वारंवार लाईट कट होते अत्यावश्यक सेवेत यासाठी तरतुद करण्यात यावी.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** अंदाजपत्रकाचे वाचन केले.

२) पान नंबर ३६ - अग्नीशमन विभाग अ.नं.१ ते ७ स्थायी समितीने सुचविलेली तरतुद वाचन केले. ११ लाख ९० हजार येणार

३) इतर - अ.नं. १ ते ६, ७ कोटी २५ लाख, ८० कोटी २४ लाख १ ते ३ मिळुन

पान नंबर ३७ कराव्यतिरिक्त उत्पन्न - ११ लाख ८५०

३८ महानगरपालिका मालमत्ता व उपयोगिता सेवा यांचेपासुन मिळालेले उत्पन्न सर्व वाचन करण्यांत आले. सन २०१६-२०१७ मध्ये आलेली व सन २०१८-२०१९ मध्ये अपेक्षीत धरलेले वाचन केले.

अ) गाळे भाडे २०१६-२०१७ ८५ लाख आले. मंगल कार्यालय १२ लाख.

अ.नं. १ ते ४६ वाचन केले.

सन २०१६-२०१७ १२ कोटी जमा यावर्षी ९० कोटी अपेक्षीत धरले आहेत.

अनुदाने व अंशदाने :- अनं. १ ते २१ वाचन केले.

प्रत्यक्ष अपेक्षीत :- ९५ कोटी ९३ लाख

ई) पान नंबर ४३ संकिर्ण सन २०१६-२०१७

अ.नं.१ ते २७ सन २०१८-२०१९ च्या तरतुदी वाचन केले., महसुली जमा अ, ब, क, ड २५० कोटी ५० लाख अपेक्षीत प्रत्यक्षात सन २०१६-२०१७ :- १२३ कोटी जमा.

**पान नंबर ६२ खर्च बाजू.**

महसूली जमा - " क "

अ ) जल निस्सारण विभाग वाचन - एकुण १ कोटी ८१ लाख.

ब ) अ.नं.१ ते ८ वाचन केले.

एकुण सन २०१६-२०१७ ला प्रत्यक्षात १० कोटी ४५ लाख, सन २०१८-२०१९ ७५ कोटी ४७ लाख अपेक्षीत

पान नं.७२ भांडवली जमा बाजु वाचन :-

अ) केडगांव पाणी पुरवठा योजना फक्त २०१८-२०१९ तरतुदी वाचन केल्या.

अ.नं. १ ते ५३

**मा.श्री.दिप चव्हाण :-** अंगणवाडयाचे हेड धरता येत नाही. महानगरपालिकेची एकही अंगणवाडी नाही. नाविन्यपुर्ण योजना ३ ठिकाणी हेड निर्माण केले आहेत. एकच हेड करावे. राजीव आवास योजना बंद झाली आहे. ते हेड रद्द करावे. कत्तलखाना विकसीत करणे राज्य शासन, केंद्र शासनाची मंजुरी आहे का ? युआयडीएसएसएमटी योजना बंद झाली हेड रद्द करावे.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** पा.नं.७५ प्रकल्प विभाग.

अ.नं. १ ते १९ सन २०१८-२०१९ तरतुदीचे वाचन केले.

भांडवली जमा " क "

पान नं. ८७ अ ब अ.नं. ११ पर्यंत वाचन यापैकी अ.नं.७ योजना बंद झाली आहे. लेखाशिर्ष रद्द करा., खर्च बाजू पान नंबर ४६

**महसूली खर्च अ वाचन केले** साप्रवि., अ.नं. १ ते २९ वाचन केले.

नगरसचिव विभाग अ.नं. १ ते ११ वाचन केले., कर वसुली अ) जकात विभाग, ब) मालमत्ता कर वसुली विभाग, बाबनिहाय वाचन केले.

४) माहिती व जनसंपर्क व ग्रंथालय, ५) नगररचना विभाग, ६) परतावे, ७) आस्थापना, ८) निवृत्ती वेतन उपदाने वाचन केले., अग्निशमन विभाग.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** मोकाट कुत्रे बंदोबस्त करणे व दंशावर उपचार करणे यासाठी ३० लाख व १० लाख तरतुद केली आहे.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** यामध्ये २ प्रकार आहे. मोकाट कुत्रे पकडल्यावर त्याला लस द्यावी लागते. दुसरा भाग कुत्रा चावल्यावर त्या रुग्णाला लस द्यावी लागते. ठेकेदाराचे मागील बील पुरवठा केलेल्या लसीचे वरती आहे त्यामुळे तो पुरवठा करीत नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** निर्बिजीकरणाचे ३० लाखाचे हेड नाही. सभागृहात खोटी माहिती देता.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** बंदोबस्त करणे यातच निर्बिजीकरणाचा समावेश आहे.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** अंदाजपत्रकाचे वाचन केले.

पान नंबर ५५ विद्युत साहित्य खरेदी

अ.नं. ३ ते १२ वाचन केले. सन २०१७-२०१८ बील तरतुदी वाचन केल्या. , पान नं.५६ - सार्व. आरोग्य व सोयी सुविधा अ.नं. १ ते १२ वाचन केले., पान नं.५७ घनकचरा व्यवस्थापन १ ते १६ वाचन साफसफाई साठी एकुण ७ कोटी.

**मा.महापौर मॅडम :-** अर्ध्या तासासाठी सभा तहकुब करण्यांत येत आहे. सायंकाळी ६.०० वाजता पुन्हा सभा सुरु होईल.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** अंदाजपत्रकाचे वाचन केले.

३) पर्यवेक्षण पान नं.५८ अ.नं.१ ते १२ तरतुदी वाचन केल्या., ४) दवाखाने व हॉस्पीटल पान नं.५९ २ ते १९ तरतुदी वाचन केल्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** फिरते शौचालयासाठी तरतुद केलेली नाही. शहरात वेगवेगळया ग्राउंडवर कार्यक्रमा होतात. त्या ठिकाणी दिंडीच्या वेळी महिलांची कुचंबणा होते. वेळोवेळी मागणी केली असता उपलब्ध होत नाही. त्यासाठी तरतुद करावी.

**डॉ.श्री.पैठणकर :-** एक फिरते शौचालय उपलब्ध झाले आहे. दुस-या शौचालय उपलब्ध होण्यासाठी एक महिना लागेल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ६-६ सीटचे १८ वेगवेगळे मिळाले तर बरे होईल.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** नाले सफाई साठी आपण दरवर्षी खर्च करतो मागच्या वर्षी २५ मे पर्यंत ड्यु-डेट असते. मागीलवर्षी ४ ते ५ जुनला नाले सफाई चालू केली होती. ७ जुनला पाउस सुरु होतो. रासनेनगर, सावेडीभागात घरामध्ये पाणी शिरले होते. प्रशासकीय जबाबदारी आहे. आधीपासून आपण नियोजन करावे जेणे करुन ही परिस्थिती निर्माण होणार नाही.

**मा.महापौर मॅडम :-** १५ दिवसा पुर्वी मा.आयुक्त यांना नाले सफाई लवकर कार्यवाही करणे बाबत पत्र दिले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** ट्रॉली जळाली कशी. सीसीटीव्ही कॅमेरे बसवा. महानगरपालिकेच्या प्रॉपर्टी जळतात कशा.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** पंचशील हॉटेल जवळील ओढा बुजवतांना जेसीबीचे फोटो टाकले पाईप शेजारील पुन्हा ओढा केला आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** मोकळा ठेवलेला नाला बुजवला तो खुला करा.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** ओढयात पाईप पूर्वी नव्हता. ओढया शेजारील प्लॉटची हद्द मोजणी करावी लागेल.

**मा.महापौर मॅडम :-** सभेत झालेल्या चर्चेनुसार फिरते शौचालयासाठी १० लाखाची तरतुद करण्यांत यावी.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** आयुक्त साहेब आपण यावेळी लक्ष घालावे.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** वाचन थांबवा त्यांना मत मांडायची त्यांना मांडू द्या.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** पान नं.८३ अ.नं.३३ सोलर बाबत माहिती द्या किती पैसे आले कुठपर्यंत प्रगती आहे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** अमृत योजने अंतर्गत प्रकल्प २८.७५ कोटी अनुदान मंजूर केले. ४ कोटी ३१ लाख पहिला हप्ता मंजूर एमजी.पी. मार्फत डीपीआर बनवण्याचे काम केले त्यांनी डीपीआर एजन्सी नेमून सादर केला मे.शासनाकडे तो पाठविला. पिंपळगांव माळवीला बी.वॅट जनरेट होणार ती जनरेट करण्यासाठी रिपोर्ट अधिक्षक अभियंता यांचेकडे पाठवला. आम्ही तीन दिवस पाहणी केली. आपण एमएसईबी कडे तो पाठविला मुंबईच्या ऑडीसने पॉवर पर्चेस कमिटीला पाठवला. रिपोर्ट औरंगाबाद येथे सबमीट केला. ज्या त्रुटी काढल्या गेल्या त्याची पुर्तता करुन सोमवारी औरंगाबादला समक्ष दाखल करण्यांत येईल. त्यानंतर शासनाकडे सबमीट होवुन मंजूरी मिळेल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ३१ मार्च पुर्वी जर सह्या झाल्या नाही तर बिले थकीत मध्ये जाणार तो निधी लॅप्स होणार का ? विद्युत घोटाळयामुळे कामकाज थांबले होते.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** यापुर्वी मुदतवाढ दिली होती.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** कॉम्प्युटरची इंटीग्रेटेड सिस्टीम आहे. १८ एप्रिलला केडीएमसी करायला काय अडचण. एप्रिल मध्ये केडीएमसी करुन बीले काढायला अडचण नाही. पुढच्या वर्षी बजेटची तरतुद केली मागची बीले पुढे पडतील.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** थकीत देयकासाठी ३१ कोटी तरतुद केली आहे. जरी अडचण आली तरी त्यामधुन बिले अदा करता येतील.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** काही लेखाशिर्ष बंद झालेली असतात. व त्यावर काही बिले खर्ची पडतात अशासाठी ही तरतुद केली. मुदतवाढीची गरजच नाही. एप्रिलमध्ये बिले झाल्यानंतर बिले निघतील.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** आशाबाई पाचारणे या सफाई कर्मचा-याचे वैद्यकीय प्रतीपुर्तीचे बील निघत नाही. त्यांचे घरचे व्याज भरुन थकले आहेत. महानगरपालिका कर्मचा-यांची पॉलिसी उतरवण्यांत यावी.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** एप्रिल मध्ये त्यांचे बिल पेड करण्यांत येईल.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** मंडळे, संस्थांना मदतीसाठी १.५ लाख तरतुद स्थायी समितीत केली. माळीवाडयात जुनी मंडळे आहेत. स्वातंत्र्या पुर्वी पासून अस्तित्वात आहेत.

मानाचे मंडळे आहेत. धार्मिक सामाजिक उपक्रमांत ते अग्रेसर असते. कपिलेश्वर मित्र मंडळाचे कार्य नगरकरांना माहिती आहे. माळीवाडा तरुण मंडळ जवळपास ५० वर्षापुर्वीचे आहे. संगम तरुण मंडळ व दोस्ती तरुण मंडळ आहे. धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी झालेली आहे. समझोता तरुण मंडळही आहे. प्रत्यक्षकृती मधले मंडळ आहे. कागदावरचे मंडळ नाही. सर्व मंडळाच्या वतीने मी विनंती करतो सर्व मंडळांना १.५ लाख मदत करण्यात यावी. लोकशाहीर अण्णाभाउ साठे वस्तीगृहाला व्दारकमान उभारण्यात यावी. २ लाखाची तरतुद यासाठी करण्यांत यावी. किमान २० वर्षाचे ऑडीट रिपोर्ट मागवा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** उपनगरात गुरु प्रतिष्ठान पाईपलाईन रोड,स्वामी समर्थ मित्र मंडळ, यांचाही समावेश करण्यात यावा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** रसिक ग्रुप दरवर्षी कार्यक्रम आयोजित करतात त्यांना देण्यास हरकत नाही.

**मा.महापौर मॅडम :-** महानगरपालिकेची परिस्थिती पाहता शहरातील सर्व मंडळांना देणे शक्य होईल का ?

**मा.श्री.अनिल शिंदे :-** रसिक ग्रुपने कधी महापौरांना निमंत्रण दिले का ? महानगरपालिकेची परिस्थिती बिकट आहे कोणाला मदत देवू नका.

**सभागृह नेता श्री.उमेश कवडे :-** पालिकेची परिस्थिती चांगली नाही. रसिक ग्रुपला किंवा कोणालाच मदत देवू नका.

**मा.महापौर मॅडम :-** नगर जल्लोषला द्यायचे का नाही ते ठरवून घ्या.

**सभागृह नेता श्री.उमेश कवडे :-** द्यायचे नाही कोणालाच देवू नये.

**मा.महापौर मॅडम :-** सामाजिक संस्थांना देण्याकरीता ८ लाख तरतुद ठेवण्यांत आली आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** बांधील खर्च म्हणजे काय ?

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** तो करावाच लागतो १६४ कोटी यावर्षी धरला आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** मा.शासनाकडुन एलबीटी मिळणारे अनुदान किती. जीएसटी पोटी ८५ कोटी असुन अनुदान येते.१६४ कोटी बांधील खर्च आहे. शासनाकडुन वर्षभर अनुदान मिळते. ८५ कोटी यामधील डिफरन्स ८० ते ८५ कोटी लागतात. बरेचसे अधिकारी मुंबईला जातात. आगरकर साहेब मुख्यमंत्री साहेबांकडे जातात सभागृहात चर्चा झाली. एकतर वसुली केली जात नाही. पालिकेचा मनपाचा खर्च ९ ते १० कोटी सरासरी लागतात. जुलै मधील महासभेत मागणी आम्ही केली. शास्ती माफीचा निर्णय घेणेसाठी केली. त्यावेळी ढगे साहेबांनी शास्ती माफ केली. ९०, ८०, ७५ % टक्के माफी केली जवळ जवळ २ ते २.१५ कोटी मिळाले होते. त्या रक्कमेतुन एखादा विभाग सुरळीत होवू शकतो. चारठाणकर साहेबांनी प्रत्येक कर्मचा-याला ९०० ते २५ हजार रुपये मिळाले होते. या शास्ती माफीचा निर्णय का घेतला नाही. ? मा.आमदार साहेब , कुमार वाकळे, संपत बारस्कर यांनी आपणाकडे निवेदन दिले. जवळ जवळ ८० कोटी ८ लक्ष दैनंदिन खर्चासाठी आवश्यक आहे.

एकही विभाग चांगल्या पध्दतीने चालू आहे असे नाही. शास्ती माफी आपण करु शकता. एप्रिल मध्ये सुध्दा नागरीक कर जमा करतील सावेडी करांनी त्याकामी ८२ लाख भरले होते. एक लाईट बसविण्यासाठी अडचण होते. सार्वजनिक कामात आपण दुर्लक्ष करतो. एप्रिल मे महिन्यात आपले अकौंट २ कोटी रुपयांनी कसे वाढेल हे कॉग्रेस राष्ट्रवादी नगरसेवकांचे वतीने विनंती करतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मीही शास्ती माफीचे पत्र एक महिन्यापूर्वी दिले. आयुक्त साहेब यांनी केडगांव पोटनिवडणूकीची आचारसंहितेचे कारण मला सांगीतले आता आचार संहिता उठल्यानंतर मा.आयुक्त साहेब शास्ती माफीचा निर्णय घ्यावा. दोन तीन महिन्याची मुदत द्या.

नगर शहरात बससेवा बंद झाली. ६० लक्ष नुकसान भरपाईची तरतुद बजेटमध्ये केली आहे. महाराष्ट्रात कुठलीही बससेवा नफ्यात नाही. नुकसान भरपाई पोटी त्याला ९० लाखाची तरतुद करावी त्याला नवीन बस घेता येतील. नगर शहराला सेवा आपण देतो वार्षिक ३० लाख वाढ केल्याने मनपाचे काय नुकसान होणार १०० % लाईट बील आपण भरता ४०% लाईट बंद आहेत तरी आपण बील भरतो. किमान ५ ते १० वर्ष तो ठेकेदार टिकेल अशा पध्दतीने तरतुद करावी. पर्पलला सुध्दा आपण अनुदान देत होतो. दिलेल्या आपल्या बससेवे बद्दल बक्षीस मिळाले. या दृष्टीकोनातुन वाढ करावी.

**मा.श्री.सचिन जाधव :-** ५ ते ६ बसेसवर तो चालवित नाही. ५ बसेस जर आपण स्वतःच्या मालकीच्या घ्याव्यात बँक लोन घ्यावे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** आरोग्य विभागाची गाडी आपण दुरुस्त करु शकत नाही. अग्नीशमनचे वाहन दुरुस्ती अभावी मागवू शकत नाही.

**मा.सौ.मालन ढोणे :-** नगर सुधारीत पाणी पुरवठा योजनेचे अनुदानातुन तेलीखुंट परिसरात स्टॅम्प वॉल बसवायचा आहे. कुठल्याही निधीतुन करा. पहाटे ३.५० लाख.

**पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री.काकडे :-** योजनेत ते काम घेतलेले नाही. महानगरपालिका फंडातून करावे लागेल लेव्हलचा टेक्नीकल प्रॉब्लेम आहे. कोटेशन मागवून घेतो.

**मा.सौ.मालन ढोणे :-** बांधकाम बिगारी आस्थापना विभागाकडुन कर्मचारी मिळाले नाही. पाणी पुरवठा विभागाकडे कर्मचारी नाही. नाले सफाई कर्मचारी मिळत नाही. आयुक्त साहेब माहिती द्या.

**मा.श्री.सचिन जाधव :-** गाळे धारकांची सुध्दा शास्ती माफ करतो. त्यांना जे भाडे आकारले जाते त्यावर शास्ती आकारली जाते. ७०० ते ८०० गाळेधारक आहे त्यांना शास्ती माफी द्यावी.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** सावेडीतील जुने भाजी मार्केटचे काय करणार शेतक-या साठी मागीतले होते. त्यावेळी ते दिले नाही.

**मार्केट विभाग प्रमुख श्री.कैलास भोसले :-** स्थायी समिती मध्ये मंजूर झाला आहे. आत्मा संस्थेला २५ ओटे भाडयाने देणार आहोत. ५०० रुपये भाडयाने व ५ हजार रुपये अनामत रक्कम घेवून दिले जाणार आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** सावेडी भागातील हॉस्पीटलसाठी २ कोटीची तरतुद केली होती ती १ कोटी केली ती २ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त करावी.

**मा.सौ.उषा नलावडे :-** भाजी मंडईची सावेडी भागात अत्यंत आवश्यकता आहे. यशोदानगर येथे भाजी बाजार भरत आहे. रहदारीला अडचण येते. सावेडी भागात सुनियोजीत भाजी मंडईसाठी तरतुद करुन आयुक्त साहेबांनी लवकरात लवकर कार्यवाही करावी.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** वैदुवाडी, यशोदानगर, भिस्तबाग चौक येथे भाजी विक्रेते रस्त्यावर बसतात त्यांना योग्य ठिकाणी जागा द्यावी. ज्या ठिकाणी भाजी मंडई होईल त्या ठिकाणचे कच-याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी कंम्पोस्ट खत प्रकल्प उभारणी करावी.

**मा.सौ.आशाबाई बडे :-** बोल्हेगांव नागापूर येथे केअरटेकर येत नाही. अमरधाम मध्ये ४-५ ठिकाणी लाईट व्यवस्था नाही.

**डॉ.श्री.पैठणकर :-** माहिती घेवून संबंधितांना सूचना देतो.

**मा.सौ.आशाबाई बडे :-** नागापूर जिल्हा परिषद शाळे समोरील भागात साफसफाई करण्यासाठी सांगीतले तिथला कचरा उचलला जात नाही. फक्त दोन पाईप टाकले विद्यार्थ्यांना त्रास होत आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** कचरा डेपोसाठी १ कोटीची तरतुद करावी. शहरात स्वच्छता गृह महिलांसाठी तरतुद वाढविण्यांत यावी.

**मा.श्री.गणेश भोसले :-** सावेडीच्या स्मशान भुमीसाठी तरतुद केली पाहीजे. शहराच्या बससेवेत हस्तक्षेप करुन ती चालू केली पाहीजे. बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात सिझरचे काम बंद आहे. या बजेटमध्ये मोठमोठया तरतुदी केल्या त्या होणार का.

**श्री.वैभव जोशी :-** सावेडी स्मशानभुमीसाठी काही जागा खाजगी मालकीच्या आहेत. त्या आपल्या ताब्यात आलेल्या नाहीत. स्मशानभुमी साठी आरक्षीत जागा आहेत पण त्या माझ्या व आपल्या ताब्यात आलेल्या नाहीत.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** जुन्या गावठाणमध्ये स्मशानभुमी पूर्वी होती बोल्हेगावची स्मशानभुमी असणारच पुर्वीचे जुने उतारे काढा.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** मी आल्यापासून सावेडी स्मशान भूमीसाठी भूसंपादन हा पर्याय उपलब्ध आहे. नुसते सावेडीच नाहीतर त्या त्या ठिकाणी स्मशान भूमीसाठी नगररचना ने जागेचा शोध घ्यावा व स्मशानभूमी बाबत कार्यवाही करावी.

**मा.श्री.गणेश भोसले :-** ज्या ठिकाणी गाव असते त्या ठिकाणी स्मशानभूमी असतेच.

**मा.महापौर मॅडम** :- फेज-२ साठी सेप्रेट मिटींग घेवू.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मागच्या सभेमध्ये स्मशान भुमीसाठी समिती गठीत करण्यांत आली. त्या समितीने काय कामकाज केले त्याबाबत माहिती द्या. नदी पात्रात जागा आहे. आर.सी.सी.जाळी करा. सावेडी गावातील रस्त्यावर उभे राहून अंतविधी करतील. एक छोटे शेड करुन द्या.

**अभियंता श्री.बल्लाळ** :- सावेडी उपनगराचे स्मशान भूमीसाठी आपण ३-४ शेतक-यांशी संपर्क साधला. पहिल्या जागेतील शेत जमिनी जमिनमालक देण्यास तयार नाहीत. बोल्हेगावला जातांना रस्त्याच्या दोन्ही बाजुला एक पुरण्यासाठी व जाळण्यासाठी आहे. दफन करण्यासाठी शेतकरी तयार नाहीत.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- उपमहापौरांचे सर्वप्रथम अभिनंदन करतो. सन २०१८-२०१९ चे ६१९ कोटीचे बजेट मांडले. प्रत्यक्ष असल्याने आपल्या परीने वेगवेगळया माध्यमातुन मत व्यक्त केले. आयुक्त साहेब १४ मार्चला जो बजेट सन २०१७-२०१८ रक्कम रु.५४१ कोटीचे सादर केले. आता ६१९ कोटीचे बजेट सादर करतो. सन २०१७-२०१८ ला तुम्ही रिप्रोप्रिएशन बाबत कोणता बोर्ड झाला याबाबत मला उलगडा झाला नाही. हे ६ महिन्याचे बजेट आहे. सन २०१७-२०१८ चाही ६ महिन्याचे बजेट होते. एखाद्या बजेटला तरतुद नसेल तर मुख्यलेखापरिक्षक बजेट तरतुद शिल्लक नाही. असा शेरा मारतात. आक्टोबर ते मार्च अखेर कोणत्या बजेट होत्या. माध्यमातुन आपण मंजूरी दिली. हे कशा पध्दतीने बजेट मांडले. यावेळी रुपया येणार नाही का. आयुक्त साहेब, महापौर, पहिल्या पानावर चित्र तयार केले होते. कसा रुपया येईल. आता दिलेल्या पुस्तकात सन २०१८-२०१९ ला हे पान नाही. ही चर्चा त्या पध्दतीन व्हायला पाहीजे. पैशाचे सोग आणता येत नाही. चिंगम सारखे किती चघळायचे. बजेट सन २०१८-२०१९ ची तरतुदी फक्त अपेक्षीत असतात. मागच्या बजेटमध्ये घेतलेला फरक व आपण जनतेच्या केलेल्या अपेक्षांची पूर्तता किती केली हे महत्वाचे आहे. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या संदर्भात या बजेटमध्ये काही आले नाही. मागच्या पुस्तकातील मी माहिती देतो आमच्या कारकिर्दितला हा शेवटचा बजेट आहे. लोकांना जे अपेक्षित होते ते या बजेटमध्ये दिसत नाही.

नविन मालमत्ता शोध मोहिम जीआयएस मार्फत उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्नातुन हा प्रश्न मांडला होता. जीआयएस संदर्भात ३.१५ कोटीची तरतुद याचे काय झाले ? जीआयएस संदर्भात आपण ठेकेदाराला किती पैसे दिले. याबाबत माहिती द्या ? त्याने काम काय केले. सिस्टीम वापरल्या नंतर वसुली कमी का झाली.

**सिस्टीम मॅनेजर श्री.साळी** :- डिसेंबर २०१३ रोजी स्टेसालाईट या कंपनीस काम दिले. सर्व्हे डाटा फिडींगसाठी दोन वर्षासाठी मुदत होती. दोन वेळा त्यांना मुदत वाढ दिली. आज अखेर ८५००० घरपट्टी सर्व्हे केला ५०००० सर्व्हे रिव्हीजन कडे दिला आहे. १ लाख ८ हजार एकुण प्रॉपर्टी आहेत. साधारण ४० लाखापर्यंत रक्कम त्यांना अदा केली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** इ पालिकेला आउटपुट अद्याप प्राप्त झालेला नाही. महानगरपालिका लोकांच्या टॅक्स वर चालते. ४० लाख दिले १% ही त्याचा फायदा

महानगरपालिकेला झाला नाही. यावर कोणी अद्याप भाष्य केले नाही. सन १९९५-१९९६ ला १०० टक्के वसुली होत होती. एजन्सीला फक्त पैसे पुरवायचे का. तुम्ही योजनेला मंजूरी देता. त्या योजनेचा आउटपुट मिळायला नको का ?

**रिव्हीजन विभाग प्रमुख श्री.झीने** :- ५० हजार जे फॉर्म आले त्या फॉर्मचे फिडींगचे काम अद्याप सुरु झालेले नाही.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** असे प्रकरणे आहेत मॅडम सह्या करत नाहीत ब-याच प्रॉपर्टी बंद आहेत. असे दाखवले जाते त्यांची नोंद घ्या.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- मालमत्ता कराची १९० कोटी रुपयांची थकबाकी आहे मागील सभेतील माहिती दिली आहे. मागच्या बजेट मध्ये रिअल काम अशा पध्दतीने झाले याला फार महत्व आहे. पिंपळगांव माळवी ७/१२ ला नाव लावणे चांगले काम झाले. मागच्या वर्षी अमृत योजनेत एलईडी दिवे लागले नसते तर आज आम्हाला अभिनंतरचा ठराव करता आला नसता. महानगरपालिका आर्थिक परिस्थीती चांगली नव्हती गावडे साहेब सांगतात मंगळे साहेब यांनी ६१९ कोटीचे बजेट मांडले यापैकी नेमके काय समजायचे. मागील वेळी सचिन जाधव यांनी बजेट मांडले. फुगवलेल्या आकडयावर आयुक्तांचा घाव असे वृत्तपत्रात वाचले. अखेरची शिल्लक ४ कोटी शिल्लक राहणार आकडे जुळले का. मग याला बजेट कसे म्हणायचे १५ मार्च २०१७ ला आकडे पत्रकार परिषद घेवून जाहीर केले आहेत. आपण जनतेला फसवत आहात. आयुक्त बदलले का ? आकडे बदलले.

१४४ कोटी महा वितरण कंपनीला देणे आहे असे दाखवता. आता कुठे दाखवले एमजीपी (MGP) ३८९.५० लाख दाखवले आत्ताच्या बजेटमध्ये दाखवलेच नाही. मागच्या आकडया संदर्भात काही कळले नाही. पाटबंधारे यांचेकडून एक कोटी येणे बाकी आहे. अशी माहिती दिली. त्यांनी पैसे भरले का ? त्यांच्यावर काय कारवाई केली. १ कोटी वसुल झाली का नाही.

**रिव्हीजन विभाग प्रमुख श्री.झीने :-** मला पहावे लागेल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** पत्रकारांना तुम्ही माहिती दिली व आता माहिती नाही दुर्दैव आहे. ठेकेदाराला २८ कोटी देणे आहे आता किती देणे झाले आहे. ७ कोटी वाढले. बाकीचे बील निघाले.तुम्ही ६१९ कोटीचे बजेट वाढवता. ७ कोटी कशाने वाढले ते सांगा.२८ चे २४,२० यायचे राहिले ने उपमहापौर पथ दिव्याचे बील ४० कोटी देणे होते मागच्या वेळी थकबाकी होती. मात्र त्याची परिस्थिती काय आहे तरुण मंडळाची किंवा प्रायव्हेट कंपनीची मिटींग नाही. पथदिव्याची आज अखेर किती देणे आहे माहिती द्या ?

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** बजेटमध्ये दायित्व आपण आयुक्तांचे मनोगतामध्ये घेतले होते. ५०.१ लाख रुपयांची थकबाकीची बीले आली आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ९ कोटी ५० लाखाचा डिफरन्स तुम्ही कसा मांडता. मनोगतामध्ये आयुक्त जबाबदारीने बोलता.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** आता पथदिव्याची थकबाकी ११.५० कोटी आली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** थकबाकी कमी होण्यासाठी काहीच केले नाही. मानसिकता नाही. एकुण ६०३ कोटी मागचे देणे आहे पैकी सन २०१८-२०१९ ला किती देणे बाकी आहे.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :-** कर्मचारी व ठेकेदारांचे, एमएसईबी चे बील १६३ कोटी मागील थकबाकी दाखवली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** खत विघटन प्रयोगशाळा पत्रकार परिषद घेवून सांगीतले पण अद्याप मशिनरी सुरुच झालेल्या नाही.

शहर सुशोभिकरणासाठी अद्याप प्रयत्न केलेले नाही. इलेक्ट्रीकल विभागाचे बील कमी येण्यासाठी एलईडी दिवे बसवणार होते. ॲडव्हान्स चेक आता देतो चेक बाउन्स होतात. २५० कोटी संकलीत करा पोटी अपेक्षित धरले होते. संकलीत करापासून मिळणारी वसुल रक्कम ५६ कोटी ४१ हजार अपेक्षीत धरली आहे. त्यापैकी वसुलपात्र रक्कम रु.१७ कोटी आहे. कसे बजेट जमेल. ५६ कोटी कशाच्या आधारे धरता व ते पूर्ण का होत नाही. कायद्याने १५ ते २० टक्के रक्कम अपेक्षीत धरले जाते.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** १४ कोटीत तुम्ही काय काम करणार. ५६ कोटी शास्ती सोडून आहे. ६१९ कोटीच्या बजेटमध्ये शास्तीची रक्कम किती धरली आहे. ५२ कोटी कमी करुन बजेट मांडायला पाहीजे. रिप्रोप्रिएशन ६ महिन्याने होते. शास्ती माफी द्यायलाच पाहीजे. शास्ती माफी संदर्भात तुमचे काय म्हणणे आहे. कोणत्या कायद्याच्या तरतुदीतुन करणार. ६१९ कोटीतुन ५२ कोटी गेले तर आम्ही कोणत्या बजेटच्या रक्कमेला मंजूरी द्यायची.

बजेट फुगीर असता कामा नये.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ५२ कोटी मध्ये ८ कोटी शास्ती वसुल झाली मग शास्ती माफ करायला काय हरकत आहे. पाणीपट्टी ७६ कोटी अपेक्षीत, वसुलपात्र रक्कम चालू वर्षी ६ कोटी २२ लाख वसुल झाले. ७० कोटीचे त्रुटीचे बजेट झाले आहे. १२० ते १२५ कोटीमध्ये दोन हेडमध्ये चुकीचे आकडे दिले. संकलीत कराचे १४ कोटी पाणीपट्टी ६ कोटी एकुण २० कोटी वसुल, रस्ता फी २ कोटी पैकी १ कोटी वसुल झाले. २५ कोटीच्या वर बजेट नाही. कर्मचारी देणे ७० कोटी आहे. वसुलपात्र रक्कम २५ कोटी आहे.

चार झोन मधील डिमांड सांगा

झोन क्रमांक १ मागणी ६२ कोटी व १६ कोटी वसूल., झोन क्रमांक २ मागणी ५२ कोटी व ७ कोटी वसूल., झोन क्रमांक ३ मागणी ३६ कोटी व ३ कोटी ८८ लाख वसूल.

चार झोन मध्ये फक्त २६ कोटी वसुल झाले. सभागृहात रिअल पोझीशन का येत नाही. सोसायटीला ११ कोटी देणे होते आता किती कोटी देणे आहे. ७ कोटी देणे राहीले आहे. पी.ई. ला ८ कोटी देणे होते आता किती देणे बाकी आहे. कर्मचारी जात म्हणून त्यांच्याकडे पहा. आत्ताही तेवढीच बाकी आहे ती का देत नाही.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** जेवढी जमा आहे तेवढीच रक्कम देणार.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ३५ कोटीच्या वर पैसे येत नाही. व तेवढेच देणे आहे. मग कसा मेळ बसणार ६ व्या वेतन आयोगा पोटी मागील वर्षीचे देणे तेवढेच यावर्षीही आहे. तयांना निलंबीत करतात. वैद्यकीय प्रतिपुर्ती ४० लाख देणे होते. आज किती आहे. १० ते १२ लाख वाढ झाली. ठेकेदारांचे देणे २५ ते २८ कोटी मागील बजेटमध्ये देणे होते. आत्तापर्यंत ठेकेदारांना किती देणे दिले.

**मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे** :- ५० लाख देणे दिले. महानगरपालिका फंडातुन दिले आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ४० लाख रुपये जनरल फंडातुन दिले मिळणा-या पैशातुन गेले. काम होत नाही. देयके आकडे कमी का होत नाही. सप्लायरचे देणे२.३ कोटी होते. आता देणे किती आहे. यावर्षी ३.३५ कोटी देणे आहे. शिलकीचे बजेट कसे मांडतो. एमएफपी ला एक कोटी देणे होते. त्यापैकी १५ ते २० लाख दिले मागच्या वेळचा महागाई भत्ता फरक १ कोटी २३ लाख होती आता किती वाढ झाली आहे. २.२५ कोटीचा महागाई भत्ता आपण देवू शकत नाही. राज्य व केंद्र सरकारने मान्यता दिलेली असतांना आपण कर्मचा-यांना देवू शकत नाही. आपण देण का देत नाही.

रोख देणे ७० कोटी देणे आहे. त्या संदर्भात आपण काही देणे दिलेले नाही. बजेट आपण किती तास बोललो. सुवर्ण जयंती नगरोत्थान हाती आलेला नाही. जनेतेची दिशाभुल करता का. १७ मार्च २०१७ च्या समाचार मध्ये छापून आले तुम्ही पत्रकार परिषद घेतली १०० कोटी निधी मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला त्यावर काय झाले. प्रशासनाने किती पाठपुरावा केला. एवढे चांगले प्रस्ताव तयार करायचे. १४ कोटी ज्या कामाला पैसे उपलब्ध आहेत. नगरोत्थानचे किती काम शिल्लक आहे. ज्याला निधी आहे पैसे पडून आहे. ते काम पूर्ण करायचे नाही त्याचा पाठपुरावा प्रशासन करीत नाही व म्हणायचे पालिकेची आर्थिक परिस्थीती ठिक नाही प्रशासन सांगते.

**मा.आयुक्त श्री.मंगळै साहेब :-** १४ वा वित्त आयोगातुन बरीचशी प्रकरणे मार्गी लागली आहेत. घनकचरा विभागाकडुन कचरा ढकल गाड्या खरेदी प्रस्तावीत केल्या आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** परिवहन समिती सुध्दा अद्याप गठीत झालेली नाही. शिक्षण मंडळा संदर्भात शब्द काढलेला नाही. त्याची कुठे मांडणी केली नाही. ५०% आपल्याला द्यावे लागतात. नगरोत्थानचे शिल्लक पैसे धरले नाही. अमृत भुयारी गटरचे पैसे धरलेले नाही.

कर्मचा-यांना प्रमोशन देत नाही. ६/०२/२०१५-१६ ला आकृतीबंध मंजूर झाला. सर्व साधारण लोकांना प्रमोशन देत नाही. एका कर्मचा-याचा हायकोर्टात निकाल झाला त्यांची रक्कम देत नाही. कोंडाकडून सह्या घेतात चव्हाण साहेब आलेनंतर त्यांना प्रभारी म्हणून ठेवणार का ? शासनाकडून आलेले लोक कमी करा. अकौंटला आपले कर्मचारी भरा. अति.आयुक्त आपले भरा . नगरपरिषदेत फक्त एकच पद शासकीय होते. १५० वर्ष महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी चालविते. अधिकारी नाही म्हणुन कामे रखडली. पोलीस

कंम्प्लेट द्यायला चार कर्मचा-यांना नेमले. एकही आपले ऐकायला तयार नव्हते आज ही जी वेळ तुमच्यावर आली कशामुळे आली ?

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** सहाय्यक आयुक्त पदे पदोन्नतीने भरता येतील.

फक्त कागदावरच दिसतात. अभियंत्यांना एप्रिल महिन्यात पदोन्नती देण्याबाबत सकाळी चर्चा झाली. आस्थापना सूचीवरील पदे भरण्यात आले नाहीत याबाबत वारंवार मा.शासनाकडे पाठपुरावा केला. पदोन्नतीने भरता येण्यासारखी पदे भरता येतील.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** किती दिवसात कार्यवाही करणार.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** १५ ते २० दिवसात कार्यवाही करु.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** अनधिकृत बांधकामापासून मिळणारे दंडात्मक उत्पन्न सन २०१७-२०१८ वर्षात २ कोटी १५ लाख होतात. एकुण नगरसेवक स्वेच्छा निधीमध्ये किती रक्कम लागते चर्चा करा. इतर ठिकाणी वर्ग करु नका. शासकीय येणारे सर्व अनुदानातुन कामे सुचित करण्याचे अधिकार मा.महापौर यांना देण्यात यावे.

**मा.सभागृह नेता श्री.उमेश कवडे :-** त्यास मी अनुमोदन देतो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मोबाईल टॉवर मध्ये किती काम खतवले. ४ कोटी रुपयांची कामे त्यात खतवले. ही दंडात्मक रक्कम आहे. दरवर्षी तेवढी रक्कम येणार नाही. सांस्कृतिक व क्रीडा या हेडखाली केंद्र सरकार रक्कम देते.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** १४६ सेवा निवृत्त कर्मचारी आहेत त्यांची चुकीची नोंद लागल्याने १ कोटी ६ लाख त्यांचा फरक देणे बाकी आहे. ते केंव्हा देणार.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कर्मचारी यांचा महागाई भत्ता देण्यांत यावा.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** पदोन्नती देतांना अटी-शर्ती शिथील करा. अडचणी निर्माण करु नका आर्थिक देणे देण्यासाठी व्यवस्था करा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महापौर निधीतील १६-१७ तील कामासाठी स्पील ओव्हरची तरतुद केली नाही. मागच्या बजेटला तेवढी करुन घ्या हेड तयार केले तरच देयक देता येतील सुधारणा करुन घेण्यांत यावी.

**मा.सभागृह नेता श्री.उमेश कवडे :-** सर्वांनी शांतपणे ऐकुण घेतले. याबदल सर्वांचे आभार.

**मा.महापौर मॅडम :-**

मा.सदस्यांनी सुचविलेल्या शिफारशी व मिळालेल्या पत्रानुसार सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ चे मुळ अंदाजपत्रक मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारशी व मा.सर्वसाधारण सभेत झालेल्या चर्चेमध्ये मा.महासभेने केलेले बदल व शिफारशीनुसार अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येत आहे. व सदर अंदाजपत्रकाच्या प्रती काढून घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

## मा.महापौर साहेब यांचे मनोगत

### ।। नमस्कार ।।

अहमदनगर शहराचे ग्राम दैवत श्री. विशाल गणपती व महाराष्ट्राचे कुलस्वामिनी आई तुळजा भवानी व राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा. महाराष्ट्राचे आराध्य दैवत राजा शिवछत्रपती , आदरणीय हिंदू हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आर्शिवादाने, तसेच महात्मा ज्योतिबा फुले, शाहु महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचाराने महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये नागरिकांना चांगल्या नागरी सुविधा देण्यासाठी व शिवसेना पक्ष प्रमुख मा.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब, राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, अहमदनगर जिल्हा पालकमंत्री मा.ना.श्री.रामजी शिंदे साहेब, सार्वजनिक बांधकाम मंत्री मा.ना.श्री.एकनाथरावजी शिंदे साहेब, गृहराज्य मंत्री मा.ना.श्री.दिपकजी केसरकर साहेब, शिवसेना उपनेते मा.श्री.अनिलभैय्या राठोड साहेब, मा.श्री.अभयजी आगरकर , सर्व मनपा पदाधिकारी , सर्व सहकारी नगरसेवक , नगरसेविका आपले मार्गदर्शन व सहकार्य तसेच अधिकारी व कर्मचारी वर्गाचे सर्वतोपरी सहकार्य मला कामकाज करतांना मिळत आहे, शहराचा विकासाचा अनुशेष मोठा असून तो भरून काढण्यासाठी मा.शासनाकडून महानगरपालिकेस मोठया स्वरूपात निधी मिळण्याची आवश्यकता आहे. महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांच्या नागरी सुविधेची कामे करण्याचा प्रयत्न करित आहे. मी अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१८- २०१९ या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रक घेउन आपणा समोर येत आहे.

या आर्थिक वर्षामध्ये नागरिकांना नागरी सुविधा देताना शहर व उपनगराच्या विकासाच्या दृष्टीने व आपणा सर्वांच्या सहकार्याने शहराचा विकास करण्यासाठी जास्तीत जास्त कामे पुर्ण करण्याचा मानस असून मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढवून मनपाचा इतर खर्च कमी होण्याच्या दृष्टीने मनपाच्या काही सेवा व प्रकल्प खाजगीकरणाच्या माध्यमातून विकसीत करून शहर वासियांना नागरी सुविधा देण्याबाबतचा उपक्रम हाती घेण्याचा प्रयत्न आहे.

- **ऐतिहासिक व धार्मिक महत्व पाहता यातून पर्यटन विकासासाठी प्रयत्न -** नगर शहर व परिसरातील राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज साहेब यांचे समाधीस्थळ, विशाल गणपती मंदिर, अवतार मेहरबाबा, केडगांव येथील रेणुका देवी, भिंगार येथील रोकडेश्वर मंदिर तसेच फ-याबाग , भिस्तबाग महाल , अहमद शहा बादशहा यांचे समाधीस्थळ परिसर बागरोजा, भुईकोट किल्ला अशा परिसरातील ऐतिहासिक व धार्मिक महत्वाच्या दृष्टिने या परिसराचा विकास होण्याकरिता पर्यटनाच्या माध्यमातून विकास योजना राबविल्याने या मधून विविध व्यवसायांना चालना मिळून रोजगार निर्मिती होण्यास मदत होणार आहे. याकरिता मा.शासनाच्या संबंधीत विभागाशी संवाद साधनेचे दृष्टीने याबाबत प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहे.

- **कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना नुतनीकरण-** कै.बा.दे.दवाखान्याचे नुतनीकरण व अदयावतीकरणासाठी मा.शासनाकडे सविस्तर प्रस्ताव सादर करून निधीची मागणी करण्यात आली . त्यास मा.शासनाची मंजूरी अप्राप्त आहे. कै.बा.देशपांडे दवाखान्याची इमारत अत्यंत जुनी असून या दवाखान्यामध्ये जिल्हयातून गरजू व गरिब रूग्ण येतात. त्यांना चांगल्या सुविधा देण्याच्या दृष्टिने सदर इमारतीचे लवकरात लवकर नुतनीकरण होणे अपेक्षित आहे. त्यासाठी मनपा निधीतून टप्पा क्र. १ चे रूपये ५ कोटी खर्चाचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.
- **शहरामधील नालेगांव येथे मनपाचे अमरधाम असून या ठिकाणी अंत्यविधीसाठी नागरिक मोठया प्रमाणात येत असतात**. पावसाळयामध्ये नागरिकांची गैरसोय होते. याकरिता दहन ओटया समोरील जागेत शेड उभारून बसण्याची व्यवस्था करणे बाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.
- **शहरामध्ये महिलांसाठी शौचालयाची व्यवस्था नाही त्यामुळे महिलांची गैरसोय होते. याकरिता गंजबाजार, गाडगीळ पटांगण, महालक्ष्मी उदयान, सावेडी जॉगिंग ट्रॅक येथे शौचालय बांधण्याच्या दृष्टिने संबंधीत विभागास आदेश देण्यात आलेले आहेत.**
- **खाजगी करणाच्या माध्यमातून चौक सुशोभिकरण -** खाजगीकरणाच्या माध्यमातून चौक सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने शहरातील काही उदयोजक व व्यवसाय संस्था यांचेशी चर्चा केलेली असून त्यांनी शहरातील चौक सुशोभिकरणाबाबत तयारी दर्शविलेली आहे. फिरोदिया ग्रुप मार्फत नेप्ती नाका चौक सुशोभिकरण करण्याचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. तसेच एल ॲन्ड टी कंपनी मार्फत सन फर्मा कंपनी या व्यवसाय संस्थे मार्फत देखील चौक सुशोभिकरणाबाबत कार्यवाही करण्यात येईल.
- **माळीवाडा येथील सौभाग्य सदन येथील जागेत खेळाडूसाठी -** शहरातील होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टिने अदयावत स्वरूपात कॅरम हॉल, बॅडमिंटन हॉल, योगा हॉल, क्रीडा प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याबाबत निविदा प्रक्रिया सुरू असून लवकरच कामास सुरूवात करण्यात येणार आहे.
- **सावेडी उपनगरामध्ये नाटयगृह-** नाटयगृहाचे काम सुरू असून आधुनिक व अद्यावत पध्दतीचे नाटयगृह बांधण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. त्यादृष्टिने कार्यवाही सुरू आहे. नाटयगृहाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.
- **सावेडी परिसरासाठी स्मशानभूमी उभारणे-** ही गेल्या अनेक वर्षापासून नागरिकांची मागणी असून याभागातील नागरिकांना शहरातील अमरधाम दूर पडते. त्यादृष्टिने स्मशानभूमी उभारणे बाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टिने नगररचना विभागा कडून जागेबाबत कार्यवाही सुरू असून आरक्षीत जागेबाबत टीडीआर अथवा भूसंपादनाच्या

माध्यमातील कार्यवाही प्रशासनाने लवकरात लवकर करावी. असे आदेश देण्यात आलेले आहे. जेणे करून सावेडी भागात स्मशानभूमी उभारता येईल.

- **मा.शासनाच्या अमृत योजना**
- **१)** पाणी पुरवठा विषयक कामासाठी १०७ कोटी रूपये मंजूर झाले असून त्याची निविदा प्रक्रिया करून कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. लवकरच कामास सुरूवात करण्यात येणार आहे.
- **२)** शहरी भुयारी गटर योजना १२७ काटीची मंजूर असून त्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. लवकरच कामाला सुरूवात करण्यात येणार आहे.
- महापौर चषक स्पर्धे अंतर्गत महापौर केसरी कुस्ती स्पर्धा भरविण्याचा मानस आहे. यातून शहरातील व राज्यातील कुस्तीपटूना प्रोत्साहन मिळेल
- भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे चा मानस असून त्या दृष्टिने प्रशासनास कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. . तसेच छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेबाबत जागा निश्‍चिती करून लवकरच पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्याच्या दृष्टिने देखील ठराव पारित झालेला असून त्याची ही कार्यवाही हाती घेण्याचा मानस आहे.
- **घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अंतर्गत -** शहरामधील आरोग्य विषय प्रश्नांची सोडवणुक होण्यासाठी व शहर स्वच्छ राहण्याच्या दृष्टिने यंत्र सामग्री खरेदी बाबत कार्यवाही सुरू आहे.तसेच कचरा संकलन व वाहतुक बाबतच्या महत्वपूर्ण उपक्रम लवकरात लवकर कार्यान्वीत होण्याच्या दृष्टिने प्रशासनाकडून निविदा प्रक्रिया सुरू आहे.
- **पिंपळगांव माळवी येथील मनपाच्या जागा विकसीत करणे.** मनपाचे आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत मोठया स्वरूपात वाढविणे आवश्यक असून मनपाच्या पिंपळगांव माळवी येथील जागेत नविन प्रकल्प उभारून मनपाचे उत्पन्न वाढविण्ययाच्या दृष्टिने प्रयत्न सुरू आहे.
- **महालक्ष्मी उदयान, सिध्दीबाग खाजगी करणाच्या माध्यमातून विकसीत करणार -** महानगरपालिकेच्या बागा आकर्षक करण्यासाठी तसेच नागरिकांना फिरण्यासाठी व लहान मुलांना खेळण्यासाठी, प्रसन्न वातावरण असणे तसेच शहर सौदर्यामध्ये भर पडण्याच्या दृष्टिने खाजगी करणातून सार्वजनिक बागांचा विकास करण्याचा मानस आहे. सिध्दीबाग येथे एल ॲण्ड टी कंपनीच्या माध्यमातून उदयान विकसीत करण्यात येणार आहे.

- **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र** - स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र इमारतीचे काम पूर्ण झाले असून या इमारती मधील ऑडीटरीयम हॉल विदयार्थाना सुसज्ज यंत्रेणेसह उपलब्ध करून देण्याचा मानस असून अंतर्गत सजावटीसह फर्निचरची व्यवस्था करण्याबाबत प्रशासनास आदेश देण्यात आले. लवकरच विद्यार्थ्यांना नविन इमारती मध्ये शिक्षण सुरू करण्यात येणार आहे.
- **मा.शासनाच्या नगरोत्थान योजना** (जिल्हास्तर),दलित वस्ती सुधार योजना, रस्ता अनुदान, मुलभूत सुविधा विकास योजना ,नागरी दलितेतर विकास निधी, अल्प संख्यांक बहुल क्षेत्र विकास योजना तसेच नाविन्य पूर्ण प्रस्तावातून जिल्हा नियोजन समिती कडून मान्यता दिल्यानुसार करावयाची कामे अशा विविध मा.शासनाच्या अर्थ सहाय्य असलेल्या योजना निविदा तसेच इतर कार्यालयीन सोपस्कार कालबध्द मुदतीमध्ये पूर्ण करून प्रशासनाच्या माध्यमातून कामे लवकरात लवकर मार्गी लावण्याचा मानस आहे. मनपाची आर्थिक परिस्थिती विचारत घेता या योजनेतील कामांमुळे शहराचा विकासास मदत होईल.
- शहरातील बेघर व फुटपाथवर राहणा-या नागरिकांसाठी मा.शासनाच्या एनयूएलएम या योजनेतून रात्रनिवाराची सोय करण्याच्या दृष्टिने निधी उपलब्ध असून त्याबाबत कार्यारंभ आदेश देण्यात आले असून लवकरच कामास सुरूवात होणार आहे. त्यासाठी मा.शासनाकडून १ कोटी ७५ लाख रूपये अनुदान मंजूर झाले आहे.
- **प्रधानमंत्री आवास योजना-** अहमदनगर महानगरपालिकेमार्फत प्रधान मंत्री आवास योजना राबविण्यात येत असून केडगांव येथे ६१२ घरे व काटवन खंडोबा येथे १९२ घरांचा प्रस्ताव म्हाडा मुंबई येथे सादर करण्यात आला आहे. त्याची मंजूरी अंतिम टप्प्यात आहे.
- **अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज**-२ - या योजनेच्या कामास गती देण्यात आली असून अंतर्गत पाईप लाईन वितरणाचे कामास देखील गती देण्यात आली असून कल्याण रोड, शिवाजी नगर परिसरातील पाईप लाईन वितरणाचे काम लवकरच पूर्ण होणार असून येथील नविन टाकीतून पिण्याचे पाणी या भागास वितरण करण्यात येणार आहे. तसेच निर्मलनगर येथील पाण्याच्या टाकीच्या परिसरातील पाईप लाईन वितरणाचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर असून या टाकीतून देखील पिण्याचे पाणी वितरणाचे नियोजन आहे. मुळाधरण येथून शहरासाठी पुरेशा प्रमाणात पाणी उपसा होवून शहरवासीयांना पुरेश दाबाने पाणी पुरवठा व्हावा याकरीता पहिल्या टप्प्यातील इलेक्ट्रीक मोटार्स बसविण्यात आली आहे. सुधारीत पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने यंत्रणा सज्ज करावी अशा सुचना प्रशासनास केलेल्या आहेत.

- **सेल्फी पॉईंट उभारणार -** महानगरपालिकेच्या महालक्ष्मी उदयान व गंगा उदयान येथे सेल्फी पॉईंटचे काम सुरू आहे. तसेच अहमदनगर शहरात मनपा जागेत नागरिकांसाठी सेल्फी पॉईट उभारण्याचा मानस आहे. त्यामुळे त्या ठिकाणचा परिसर सुशोभित होईल. तसेच सेल्फी पॉईट मुळे विशेष करून तरूणांमध्ये आकर्षण निर्माण होईल.

सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक प्रशासनाने तयार करून मा.महासभेपुढे सादर केले आहे. महानगरपालिका उत्पन्नाचे स्त्रोत व नागरी सुविधेचे प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टिने तोंड मिळवणी करत व शहराचा विकास साधण्याचा निश्चित कार्यक्रम असून यातील योजना शहरवासियांसाठी राबविण्यात येणार आहेत. यामाध्यमातून शहरातील नागरिकांना सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.

या सर्वाचा विचार करून या शहराचे नागरिक निश्चितपणे मनपास सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे. तसेच आपल्या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य याची अपेक्षा करित असून ते आपणा सर्वांनकडून निश्चित मिळेल या अपेक्षेसह उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व पत्रकार बंधू व इलेक्ट्रॉनिक मिडीया यांचे प्रतिनिधी यांनी माझे मनोगत शांतपणे ऐकून घेतले याबद्दल आभार.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

आपली,
सही /-
सौ.सुरेखाताई कदम,
महापौर
अहमदनगर महानगरपालिका

**ठराव :-**

सन २०१७-२०१८ चे जमा व खर्च बाजूमध्ये सुधारीत व सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रकाबाबत मा.स्थायी समितीने केलेल्या सुचना, दुरूस्त्या व फेरफार व शिफारशीसह तसेच मा.महासभेमध्ये मा.सदस्यांनी केलेल्या सुचना व दिलेले पत्र तसेच दुरूस्त्या फेरफार यासह अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मा.महासभेमध्ये प्रामुख्याने झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे मुद्यांबाबत कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**१)** स्वेच्छा निधी व वॉर्ड विकास निधी या लेखाशिर्षा मधून मा.नगरसेवकांनी सुचविलेली कामे करता यावी याकरिता सदर निधीतील देयके अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे या लेखाशिर्षामध्ये जमा होणा-या रकमेतून प्राधान्याने देण्यात यावे.तसेच उर्वरित रक्कम मनपा फंडातून अदा करणे बाबत कार्यवाही करावी.

**२)** छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे या लेखाशिर्षात रक्कम रूपये ३० लाखानी वाढविण्यात यावी.

**३)** महालक्ष्मी उदयान, सिध्दीबाग खाजगी करणाच्या माध्यमातून विकसीत करणे कामी आकर्षक शहर सौदर्यामध्ये भर टाकणा-या आणि शहरवासियांना मनास प्रसन्न व अल्हाददायक वातावरण असणा-या असाव्यात यादृष्टिने नविन तंत्र व माहितगार काम करणारी संस्था यांचेमार्फत सार्वजनिक बागांचा विकास करण्याच्या दृष्टिने निविदा मागविणे बाबत कार्यवाही करावी.

**४)** सावेडी परिसरासाठी स्मशानभूमी उभारणे ही गेल्या अनेक वर्षापासून नागरिकांची मागणी आहे या दृष्टिने नगररचनाकार व मा.आयुक्त यांनी याबाबत लक्ष घालून याबाबत योग्य ती कार्यवाही करणेसाठी टीडीआर अथवा भूसंपादनाच्या माध्यमातील कार्यवाही प्रशासनाने लवकरात लवकर करून व जागा ताब्यात घेवून स्मशानभूमी उभारण्याच्या दृष्टिने कार्यवाही करावी. सदर कामास प्राधान्य देण्यात यावे.

**५)** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर , महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे तसेच परिसर सुशोभित करणे बाबत लवकरात लवकर कार्यवाही होण्याची गरज असुन याबाबत प्रशासनाने आवश्यक ती पुढील तातडीने कार्यवाही करावी.

**६)** महापौर केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करावयाची असल्याने महापौर चषक स्पर्धा या लेखाशिर्षात रक्कम रूपये १० लाखानी वाढ करण्यात यावी.

**७)** माळीवाडा येथील सौभाग्य सदन येथे शहरातील होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टिने अदयावत स्वरूपात कॅरम हॉल, बॅडमिंटन हॉल, योगा हॉल, रायफल शुटींग, आर्चेरी, लेडीज जीम, क्रीडा प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याबाबत निविदा प्रक्रिया सुरू असून लवकरच कामास सुरूवात करण्यात येणार आहे. यासाठी रक्कम रूपये ७५ लाखाची तरतूद करण्यात यावी व सदरचा खर्च विकासभार या निधीतून भागविण्यात यावा.

**८)** रेल्वे स्टेशन लोखंडी पुला शेजारील पुलाच्या बांधकामाकरिता मा.शासनाकडे निधी ची मागणी करण्यात आलेली आहे. याकरिता नागरी दलितवस्ती सुधार योजना (अनुदान )या लेखाशिर्षात रक्कम रूपये ४ कोटीनी तरतूद वाढविण्यात यावी.

**९)** नाटय संकुलासाठी मनपा हिस्सा या लेखाशिर्षात १ कोटी २१ लाखांनी वाढ करण्यात यावी.

**१०)** विरोधी पक्ष नेते मा.श्री.बाळासाहेब बोराटे, नगरसेवक मा.श्री.सचिन जाधव , नगरसेविका विणाताई बोज्जा यांचे पत्रानुसार रसिक ग्रुप अहमदनगर व नगर जल्लोष ट्रस्ट, अहमदनगर यांना सांस्कृतिक कार्यक्रमासाठी रक्कम रू. १ लाख अर्थ सहाय्य देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मागणी केलेल्या संस्थाचे धर्मदाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत असलेबाबत कागदपत्र, ताळेबंद व चार्टड अकौंट यांचेकडील हिशोब तपासणी आदी आवश्यक कागदपत्रांची खातरजमा करूनच संस्थाना अर्थ सहाय्य देणे बाबत कार्यवाही करणेत यावी. सदरचा खर्च सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.

**११)** अहमदनगर शहर सुधारित पाणी पुरवठा योजने अंतर्गत वसंतटेकडी जलकुंभ येथे ११ KV एक्सप्रेस फिडर करणेसाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.लि. मर्या. (MSEDCL) कडून प्राप्त झालेल्या सुधारित कोटेशन नुसार फरकाची रक्कम रूपये ३,८२,४७०/- इतकी वाढीव रक्कम MEEDCL यांचेकडे भरणेस ही सभा मान्यता देत आहे.

**१२)** अहमदनगर शहर सुधारित पाणी पुरवठा योजना फेज -२ ही योजना पूर्ण करणेस मनपा हिश्यापोटीच्या निधीची आवश्यकता आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने, महानगरपालिका स्तरावर हा निधी उभारणे जिकरीचे आहे. करिता मा.शासनाकडून "विशेष निधी " स्वरूपात अनुदान मिळणे बाबत मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करावा.

**१३)** अहमदनगर शहरात अनधिकृत नळ कनेक्शन शोध मोहिम राबविण्यात यावी. या अंतर्गत

**अ)** माहे एप्रिल २०१८ ते माहे जुलै २०१८ या कालावधीत जे नागरिक त्यांचे अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करून घेतील त्यांना दंडनीय आकारणी करण्यात येवू नये. त्यांचेकडून रू. २२०० + रू. १५०० असे मिळून रू. ३७००/- इतकी आकारणी घेण्यात यावी.

**ब)** जे नागरिक माहे ऑगस्ट २०१८ ते माहे नोव्हेंबर २०१८ या कलावधीत न कनेक्शन अधिकृत करतील त्यांना वरील रक्कमेसह रू. १०००/- इतका दंडनीय आकार आकारण्यात यावा, म्हणजेच त्यांचेकडून रू. ४७००/- इतकी रक्कम वसुल करण्यात यावी.

**क)** जे नागरिक नळ कनेक्शन माहे डिसेंबर २०१८ ते मार्च २०१९ या कालावधीत अधिकृत करतील त्यांना रू. २०००/- इतका दंडनीय आकार आकारण्यात यावा. म्हणजेच त्यांचेकडून रू. ५७००/- इतकी रक्कम वसुल करण्यात यावी.

पाणी पुरवठा विभागाने वरील धोरणा बाबत व्यापक स्वरूपात प्रसिध्दी दयावी व नागरिकांना अधिकृत नळ कनेक्शन करणेस उदयुक्त करावे.

**१४)** नगर शहर सुधारित पाणी पुरवठा योजना अनुदान या लेखाशिर्षात रक्कम रू.२८ कोटी ऐवजी १६ कोटी रूपयाची तरतूद करण्यात यावी.

**१५)** नगर शहर पाणी पुरवठा योजना कर्ज (हुडको) या लेखाशिर्षात रक्कम रूपये ९ कोटीने वाढ करण्यात यावी.

**१६)** नळ कनेक्शन बदलणे या लेखाशिर्षात रक्कम रूपये ४० लाखाने तरतूद कमी करण्यात यावी.

**१७)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, नविन टिळक रोड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट पेन्शील चित्राद्वारे रेखाटणे, याबाबत यापूर्वी झालेल्या ठरावानुसार त्वरीत कार्यवाही करावी. या ठिकाणी वरीलप्रमाणे , तसेच कलादालन , सुशोभिकरण,

आवश्यक दुरूस्ती, अभ्यासिका इत्यादी करणे, इत्यादी बाबत रू. ३०.०० लाखाची तरतूद करण्यात यावी. इमारत दुरूस्ती या लेखाशिर्षात ३० लाखानी वाढ करण्यात यावी.

**१८)** नगरसेवक मा.श्री.दत्तात्रय कावरे यांचे पत्रानुसार विळद जलशुध्दीकरण केंद्र येथे उच्च दाब कनेक्शनमध्ये लोड वाढविणेसाठी पाणी पुरवठा योजनेसाठी मुळा नगर, विळद येथील विदयुत भार वाढविणे या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये २.५८ कोटी इतक्या रकमेने वाढ करण्यात यावी. सदरचे काम मनपाच्या वतीने करण्याच्या दृष्टिने निविदा प्रक्रिया राबवून काम लवकरात लवकर करणे बाबत कार्यवाही करावी.

**१९)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर व आण्णाभाउ साठे वसाहत माळीवाडा येथे नावाच्या कमानी उभारण्याबाबत बांधकाम विभागाने कार्यवाही करावी.

**२०)** माजी सभागृह नेता मा.श्री.अनिल शिंदे यांनी मा.महासभेमध्ये मांडलेल्या सुचनानुसार मा.शासनाकडून विविध विकास कामांसाठी विविध योजने अंतर्गत मनपास निधी मंजूर करण्यात येतो. सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ साठी प्राप्त होणा-या मुलभूत / प्राथमिक सुविधा विकास निधी , रस्ता अनुदान, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर), नागरी दलित वस्ती सुधार योजना, अल्पसंख्याक बहुलक्षेत्र विकास निधी, नागरी दलितेतर विकास निधी , नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत विकास कामे आदी मा.शासनाच्या निधीतील कामे सुचीत करण्याचा अधिकार मा.महापौर साहेब यांना देण्यात येत आहे यास ही सभा मान्यता देत आहे.

**२१)** अग्निशमन विभागाकरिता नविन वाहन खरेदी या लेखाशिर्षात रक्कम रू. २० लाखाची वाढ करण्यात यावी.

**२२)** फिरते शौचालयाबाबत नागरिकांची मागणी पाहता आणखी २ नविन फिरते शौचालय खरेदी करणे करिता नविन फिरते शौचालय खरेदी या लेखाशिर्षात रक्कम रू. १० लाखाची तरतूद करण्यात यावी.

**२३)** नगरसेवक मा.श्री.दत्तात्रय कावरे यांनी दिलेल्या पत्रानुसार बुरूडगांव रोड येथे बीओटी तत्वावर चालविण्यास देण्यात आलेले बायोमेडिकल प्रकल्पाची मुदत जुलै महिन्यात संपत असल्याने या प्रकल्पास मुदत वाढ न देता नव्याने निविदा प्रक्रिया करून प्रकल्पासाठी होणारा खर्च विचारात घेता निविदेमध्ये १५ वर्षाची मुदत देण्यात यावी यास ही सभा मान्यता देत आहे.

**२४)** मागील आर्थिक वर्षातील विकास कामांचे प्रस्तावास तांत्रिक कारणास्तव विलंब झालेला आहे त्यामुळे काही प्रस्तावांना चालू आर्थिक वर्षात निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्यादृष्टिने खालील लेखाशिर्षात तरतूद वाढविणे आवश्यक आहे.

* महापौर शहर विकास निधी या लेखाशिर्षात २ कोटीनी वाढ करण्यात यावी.

* चटई क्षेत्र निर्देशांक प्रिमीयम रक्कमेतून कामे करणे या लेखाशिर्षात ४ कोटींची तरतूद करण्यात यावी. सदर लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात आलेल्या विकास कामांची देयके यामधून अदा करण्यात यावी.

* विकासभार निधी या लेखाशिर्षात १ कोटींनी वाढ करण्यात यावी.

* आपत्कालीन व्यवस्थापन खर्च (बांधकाम ) या लेखाशिर्षात रक्कम रू. १ कोटींची तरतूद करण्यात यावी.

* रेखांकन अंतर्गत सुधारणा (लेआउट धारक ) या लेखाशिर्षात ५० लाखानी वाढ करण्यात यावी

**२५)** शहरामधील नालेगांव येथे मनपाचे अमरधाम असून या ठिकाणी अंत्यविधीसाठी नागरिक मोठया प्रमाणात येत असतात. पावसाळयामध्ये नागरिकांची गैरसोय होते. याकरिता दहन ओटया समोरील जागेत शेड उभारून बसण्याची व्यवस्था करणे याकरिता रक्कम रूपये ४५ लाखाची तरतूद करण्यात यावी सदरचा खर्च विकासभार निधीतून भागविण्यात यावा.

**२६)** महिलांसाठी शौचालयाची व्यवस्था नाही त्यामुळे महिलांची गैरसोय होते. याकरिता गंजबाजार, गाडगीळ पटांगण, येथे शौचालय बांधण्यासाठी संबंधीत विभागाने कार्यवाही करावी. सदरच्या कामास प्राधान्य देवून लवकरात लवकर कार्यवाही करावी.

**२७)** शहरातील प्रमुख चौक सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने खाजगी संस्था, कंपनी, सामाजिक संस्था, यांचे मार्फत कार्यवाही करण्यात यावी तसेच शहरातील प्रमुख रस्त्यावरील डिव्हायडर सुशोभिकरण करणे देखील आवश्यक असून त्यामुळे परिसर देखील सुशोभित होईल याकरिता डिव्हायडर सुशोभिकरण खाजगी संस्था, कपंनी, सामाजिक संस्था यांचे मार्फत करण्याबाबत परवानगी देण्यात यावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

**२८)** शहर स्मार्ट सिटी होण्याच्या दृष्टिने व मनपाच्या वीज बचती करिता संपूर्ण शहरामध्ये एलएडी फिटींग बसविण्याच्या दृष्टिने प्रशासनाने एस्को पध्दतीने PPP (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप ) तत्वावर कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

**२९)** बुरूडगांव रोड व केडगांव या उपनगरामध्ये उदयान विकसीत करणे या लेखाशिर्षात प्रत्येकी रक्कम रूपये २० लाख तरतूद करण्यात यावी.

**३०)** नाना पाटील वस्ताद तालीम इमारत दुरूस्ती करण्यासाठी रक्कम रूपये १० लक्षाची तरतूद करण्यात यावी. सदरचा खर्च मोबाईल टॉवर उत्पन्नातून विकास कामे या लेखाशिर्षातून करण्यात यावा.

**३१)** स्वर्गीय प्रमोदजी महाजन स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र इमारतीचे काम पूर्ण झाले असून अंतर्गत बैठक व्यवस्था व इतर किरकोळ कामे बाकी असून सदरची कामे करण्यासाठी विकास भार निधीतून ५ लाखाचा खर्च करण्यात यावा.

**३२)** महावीर नगर येथील नाल्यावर पुल बांधणे कामी पुल बांधणे व दुरूस्ती या लेखाशिर्षात १५ लाखाची वाढ करण्यात यावी.

**३३)** अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.देशपांडे दवाखान्याची इमारत जुनी झाली असून सदर ठिकाणी मोकळया जागेत नविन इमारत बांधून रूग्णांना चांगली सेवा देण्याच्या दृष्टिने मा.शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली आहे. परंतु सदरचा निधी मनपास अप्राप्त आहे. सदर ठिकाणी इमारत बांधणे आवश्यक असून मनपाच्या विकासभार या

निधीतून भूसंपादनासाठी असणारी रककम आजतागायत वापरण्यात आलेली नाही. विकासभार निधी भूसंपादनातील रक्कम रू. ५ कोटीचा निधी कै.बा.दे.दवाखाना नविन इमारतीच्या टप्पा क्र. १ च्या कामासाठी वापरण्यास ही सभा मान्यता देत आहे. त्याअनुषंगाने फेज-१ ची निविदा प्रक्रिया करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी. तसेच मा.शासनास टप्पा क्र. १ च्या मागणी करण्यात आलेल्या प्रस्तावात बदल करून त्या ऐवजी टप्पा क्र. २ च्या कामासाठी निधी मागण्याचा दुरूस्ती प्रस्ताव मा.शासनाकडेस पाठविण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**३४)** नगरसेवक मा.श्री.सचिन जाधव यांच्या पत्रानुसार मोबाईल टॉवर उत्पन्नातून विकास कामे करणे या लेखाशिर्षानुसार नविन खाते अर्थ विभागात तयार करण्यात आले असून मोबाईल टॉवर प्रशासकीय शुल्क व दंडात्मक कारवाईची वसुल झालेली रक्कम या खात्यामध्ये जमा करावी. या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात आलेल्या विकास कामांचे देयके अदा करण्यात यावे. तसेच मंगलगेट मटन मार्केट दुरूस्ती करणे असे लेखाशिर्ष करण्यात आले असून सदर दुरूस्ती केलेली कामांची देयके मार्केट विभाग वसुल करित असलेल्या गाळेभाडे पोटी येणा-या उत्पन्नातून अदा करण्यात यावी.

**३५)** झाडांना टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे या लेखाशिर्षात रक्कम रूपये २ लाखाने वाढ करण्यात यावी.

**३६)** मा.सौ.उषाताई ठाणगे, नगरसेविका यांनी दिलेल्या पत्रानुसार कल्याण रोड परिसरात सार्वजनिक दवाखान्याची गरज असून सदर परिसरात मनपा दवाखाना इमारत बांधणे बाबत प्रशासनाने प्रस्ताव तयार करावा सदर इमारतीसाठी प्रशासनाने मा.शासनाकडे निधी मिळणे कामी प्रस्ताव पाठविण्यत यावा.

**३७)** मा.महासभेमध्ये मा.सदस्यांनी पत्र देवून विकास कामांसाठी निधी मिळणे बाबत मागणी केलेली आहे. मा.शासनाकडे विकास कामांसाठी निधीची मागणी करण्यात आलेली आहे. मनपास अनुदान प्राप्त झाल्यास त्यामधून मा.सदस्यांची कामे घेण्याबाबत कार्यवाही करावी.

**३८)** वृक्षारोपन , वृक्षसंरक्षण व ट्री गार्ड खरेदी / यंत्र सामुग्री अवजारे खरेदी या लेखाशिर्षात रक्कम रूपये ५० लाखाने तरतूद वाढविण्यात यावी.

**३९)** माजी सभागृह नेता मा.श्री.अनिल शिंदे यांनी दिलेल्या पत्रानुसार मा.शासनाच्या प्राथमिक सोयी सुविधा निधीतून रक्कम रूपये २.०६ कोटी रकमेची मा.महासभेने मा.महापौर साहेब यांना दिलेल्या अधिकारानुसार २५ कामे सुचविण्यात आली होती. त्यामध्ये मनपा हिस्सा धरलेला आहे. सदर योजनेची मुदत संपल्यामुळे मा.शासनाने अखर्चीत निधी शासनाकडे जमा करण्यास सांगितले आहे. त्यामुळे सदर योजनेत मनपा हिश्याची रक्कम रू. १.०३ कोटी त्याच योजनेत स्वतंत्र ठेवून त्यामधून पत्रात नमुद केलेल्या १० कामाबाबत निविदा प्रक्रिया करून पुढील नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे. १) प्र. क्र. २७ मधील स्टेट बॅक एटीएम ते सागर कॉम्प्लॅक्स पर्यत रस्त्याचे

डांबरीकरण करणे. २) प्र.क्र. २७ खोकर नाल्याचे बाजूकडील डीपी रस्त्याचे सुशोभिकरण करणे ३) प्र.क्र. २७ मधील चाहुराणा बु. स.नं. ७६/३ अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे ४) प्र.क्र. २७ मधील गड्डम घर ते सोमनाथ भुजबळ ते प्रभाकर रस्ता डांबरीकरण करणे ५) प्र.क्र. २७ मधील सागर कॉम्प्लेक्स ते पंडीत घर ते जेजूरकर घर रस्ता डांबरीकरण करणे ६) प्र.क्र. २७ मधील एकता कॉलनी व विशाल कॉलनी डांबरीकरण करणे ७) प्र.क्र. २७ मधील गजानन कॉलनी अंतर्गत गटर व रस्ता डांबरीकरण करणे ८) प्र.क्र. २७ मधील स्मृती कॉलनी गाडळकर ते बुरा ते अशोक कुंज अंतर्गत गटर करणे. ९) प्र.क्र. २७ मधील बेल्हेश्वर कॉलनी अशोक कुंज अपार्ट. ते डागवाले सर ते नाला पर्यत जलनिस्सारण व्यवस्थेसह कॉक्रीटीकरण करणे १०) प्र.क्र. २७ मधील सन्मान हॉटेल मल्हार चौक ते आनंद नगर ते सीना नदी पर्यत गटर करणे.

**४०)** महासभेत झालेल्या चर्चे नुसार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे अदयावत जीम बांधकाम करणे व व्यायाम साहित्य खरेदी या लेखाशिर्षात रक्कम रूपये ५० लाख कमी करण्यात यावे.

**४१)** स्थायी समितीच्या सभापती मा.सौ.सुवर्णा जाधव यांच्या पत्रानुसार वाडीया पार्क तालीम मध्ये कुस्तीच्या आखाडयात लाल मातीसह लागणारा खुराक टाकणे करिता रक्कम रूपये २ लाखाची तरतूद करण्यात यावी. सदरचा खर्च क्रीडा साहित्य खरेदी या लेखाशिर्षामधून करण्यात यावा. सदरच्या लेखाशिर्षामध्ये रक्कम रू. २ लाखाने वाढविण्यात यावी.

**४२)** माजी सभागृह नेते मा.श्री.अनिल शिंदे यांनी दिलेल्या पत्रानुसार टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे या लेखाशिर्षात रक्कम रूपये ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

**४३)** रस्ता रूंदीकरणामुळे बाधीत होणा-या पाईप लाईन स्थलांतरीत / नव्याने करणे या लेखाशिर्षात रक्कम रूपये १.७० लाखाने वाढ करण्यात यावी.

**४४)** दलितेतर वस्ती सुधार योजना अंतर्गत मनपा हिश्यापोटी रक्कम रूपये ८५ लाख इतकी तरतूद करण्यात यावी. दलितेतर वस्ती सुधार योजना या लेखाशिर्ष अंतर्गत मा.शासनाकडून अनुदान मिळणार असल्याने रक्कम रूपये ५१ लाख इतकी वाढ करण्यात यावी.

**४५)** नगर शहर पर्यटन विकास निधी या लेखाशिर्षात रक्कम रूपये ५ लाखाने वाढ करण्यात यावी.

**४६)** मा.श्री.मनोज दुलम,नगरसेवक यांनी दिलेल्या पत्रानुसार श्रमिक नगर येथील व्यायाम शाळेच्या जागेत आरोग्य केंद्र इमारत बांधण्यासाठी रक्कम रूपये १० लाखाची तरतूद करण्यात यावी. नविन इमारत या लेखाशिर्षात रक्कम रूपये ९ लाखाने वाढ करण्यात यावी.

**४७)** महानगरपालिका हद्दीत नविन बांधकाम झालेल्या इमारतीचे मोजमापे घेण्याबाबत संबंधित विभागाने कार्यवाही करुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने कार्यवाही करावी तसेच अनधिकृत नळकनेक्शन शोध मोहिम राबवुन नळ कनेक्शन अधिकृत करणे बाबत नागरिकांना प्रोत्साहीत करणे बाबत संबंधित विभागाने कार्यवाही करावी. यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ होईल.

**४८)** प्रशासनाच्या मंजूर रिपोर्ट नुसार भगवान बाबा नगर , शांतीनगर परिसर, चाँदमोती कॉलनी, समर्थ नगर , नानाजी नगर, चिपाडे मळा, या परिसरात रस्ता करणे बाबत रक्कम रूपये ३० लाखाची तरतूद करण्यात यावी. सदरचा खर्च नागरी सुविधा विकास कार्यक्रम या लेखाशिर्षा मधून भागविण्यात यावा.

सन २०१७-२०१८ चे सुधारित व सन २०१८-२०१९ सालचे मुळ अंदाजपत्रक मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारशी त्याबाबत मा.महासभेत झालेली चर्चा त्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात मा.महासभेने सुचित केलेले बदल, दुरूस्त्या व फेरफार यासह व सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी. या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच सदर अंदाजपत्रकाच्या २०० प्रती छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.उमेश खंडेराव कवडे

अनुमोदक :- मा.श्री.संजय छगनराव शेंडगे

नियमानुसार कार्यवाही करावी.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

| अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर |
|---|
| |
| **मा. महासभेने मंजूर केलेला सन २०१८-२०१९ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)** |
| |
| **सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१८)..........................................७००.२४** |
| **एकुण जमा.........................................................................६३०७८.७७** |
| **सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................... ६३७७९.०१** |
| **एकुण खर्च...................................................................... ६३४६८.२८** |
| **अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१९).................................... ३१०.७३** |

| अ.-नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू) सन १८-१९ | मा. स्थायी समिती | मा. महासभेने केलेला बदल | | मा. महासभेने |
|---|---|---|---|---|---|
| | | सभेने मंजूर | वाढ | घट | सभेने मंजूर |
| | | केलेली तरतूद | | | केलेली तरतूद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले-आऊट धारक) | १५०.०० | ५०.०० | | २००.०० |
| २ | यु आय डी एस एस एम टी अनुदान- नगर शहर पाणी पुरवठा योजना अनुदान | २८००.०० | | १२००.०० | १६००.०० |
| ३ | नगर शहर सुधारीत पाणी पुरवठा योजना कर्ज (हुडको) | २०००.०० | ९००.०० | | २९००.०० |
| ४ | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम | २५०.०० | १५०.०० | | ४००.०० |
| ५ | विकास भार निधी | ५००.०० | १००.०० | | ६००.०० |
| ६ | नागरी दलित वस्ती सुधारणा अनुदान | ३००.०० | ४००.०० | | ७००.०० |
| ७ | दलितेतर वस्ती सुधारणा अनुदान | १२५.०० | ५१.०० | | १७६.०० |
| ८ | रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणा-या पाईपलाईन स्थलांतरीत/ नव्याने (देहरे) उत्पन्न | ०.०० | १९०.०० | | १९०.०० |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | **एकुण** | **६१२५.००** | **१८४१.००** | **१२००.००** | **६७६६.००** |

महापौर
अहमदनगर महानगरपालिका, अ.नगर

| अ.-नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन २०१८-२०१९ | मा. स्थायी समिती सभेने मंजूर केलेली तरतूद | मा. महासभेने केलेला बदल वाढ | घट | मा. महासभेने मंजूर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २ | छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणे | २०.०० | ३०.०० | | ५०.०० |
| ३ | महापौर चषक स्पर्धा | १५.०० | १०.०० | | २५.०० |
| ४ | पुल बांधणे व दुरुस्ती | १८०.०० | १५.०० | | १९५.०० |
| ५ | नाट्य संकुलासाठी मनपा हिस्सा | १७५.०० | १२१.०० | | २९६.०० |
| ६ | इमारत दुरुस्ती | २५.०० | ३०.०० | | ५५.०० |
| ७ | पाणी पुरवठा योजनेसाठी मुळानगर, विळद येथील विद्युत भार वाढविणे | ३२५.०० | २५८.०० | | ५८३.०० |
| ८ | नविन वाहन खरेदी (अग्निशमन विभाग) | ३०.०० | २०.०० | | ५०.०० |
| ९ | फिरते शौचालय खरेदी करणे | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| १० | महापौर शहर विकास निधी | ३००.०० | २००.०० | | ५००.०० |
| ११ | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम रकमेतून कांमे करणे | २५०.०० | १५०.०० | | ४००.०० |
| १२ | विकास भार निधीतून खर्च | १२५.०० | २५.०० | | १५०.०० |
| १३ | आपत्कालीन व्यवस्थापन खर्च (बांधकाम) | २५.०० | ७५.०० | | १००.०० |
| १४ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आऊट धारक) | १५०.०० | ५०.०० | | २००.०० |
| १५ | बुरुडगाव रोड व केडगाव उपनगरामध्ये उद्यान विकसीत करणे (प्रत्येकी १५ लाख रुपये) | ०.०० | ३०.०० | | ३०.०० |
| १६ | झाडांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे | ०.५० | २.०० | | २.५० |
| १७ | नागरी दलित वस्ती सुधारणा अनुदान | ३००.०० | ४००.०० | | ७००.०० |
| १८ | वृक्षारोपण, वृक्ष संरक्षण व ट्री गार्ड खरेदी/ यंत्र सामुग्री अवजारे खरेदी | १०.०० | ५०.०० | | ६०.०० |
| १९ | क्रीडा साहित्य खरेदी | ३.०० | २.०० | | ५.०० |
| २० | दलितेतर वस्तू सुधार योजना मनपा हिस्सा | ६२.०० | २३.०० | | ८५.०० |
| २१ | दलितेतर वस्ती सुधारणा अनुदान | १२५.०० | ५१.०० | | १७६.०० |
| २२ | यु आय डी एस एस एम टी अनुदान- नगर शहर पाणी पुरवठा योजना अनुदान | २८००.०० | | १२००.०० | १६००.०० |
| २३ | नगर शहर सुधारीत पाणी पुरवठा योजना कर्ज (हुडको) | २८००.०० | १००.०० | | २९००.०० |
| २४ | नळ कनेक्शन बदलने | ४०.०० | | ४०.०० | ०.०० |
| २५ | विकास भार निधीतून खर्च (नगररचना भू-संपादन) | ४०५.०० | ४५.०० | | ४५०.०० |
| | |  | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 48 | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| **अ.-नं.** | **लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन १८-१९** | **मा. स्थायी समिती** | **मा. महासभेने केलेला बदल** | | **मा. महासभेने** |
| | | **सभेने मंजूर** | **वाढ** | **घट** | **मंजूर केलेली** |
| | | **केलेली तरतूद** | | | **तरतूद** |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| २६ | नगर शहर पर्यटन विकास निधी | ५.०० | ५.०० | | १०.०० |
| २७ | नविन इमारत | १.०० | ९.०० | | १०.०० |
| २८ | रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणा-या पाईपलाईन स्थलांतरीत/ नव्याने करणे | २०.०० | १७०.०० | | १९०.०० |
| २९ | टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे | १००.०० | ५०.०० | | १५०.०० |
| ३० | भारतरन्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे अद्यावत जीम बाधकाम करणे व व्यायाम साहित्य खरेदी | ५०.०० | | ५०.०० | ०.०० |
| | | | | | |
| | **एकुण** | **८४३२.५०** | **१९३१.००** | **१२९०.००** | **८९८२.५०** |

महापौर

अहमदनगर महानगरपालिका, अ.नगर.